| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक २०३ वा | गुरूवार दिनांक २३ ऑक्टोबर, २०२५ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)



बहिण-भावाचे अतुट नात्याची भाऊबीज निमित्त हार्दिक शुभेच्छा..

## पालकमंत्री सरनाईक यांच्याकडून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना १०१ गोधनांची दिवाळी भेट!



धाराशिव (प्रतिनिधी) आसमानी संकटाने उद्ध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांच्या संसारात आता नव्या आशेचा किरण उजळला आहे. सप्टेंबर महिन्यात झालेल्या अवकाळी पावसाने धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे घरटी, शिवारं आणि गोठे वाहून नेले होते. मात्र या वेदनेच्या काळातही त्यांच्या डोळ्यांत पुन्हा नवजीवनाची चमक आणणारा एक हृदयस्पर्शी उपक्रम सुरू करण्यात येत आहे. - पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या वतीने ज्या शेतकऱ्यांची दुभती जनावरे वाहून गेली आहेत अथवा मृत पावली आहेत, अशा नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना १०१ दुभती गोवंश जनावरांची दिवाळी भेट दिली जाणार आहे!

नरक चतुर्थीच्या शुभमुहूर्तावर या उपक्रमाचा प्रारंभ राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी बोलतांना मंत्री सरनाईक म्हणाले की, धाराशिव जिल्ह्यातील जेष्ठ पत्रकार प्राध्यापक सतीश मापने यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची व्यथा मांडणारे पत्र लिहिले. शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या साथीदार असलेल्या दुभतु जनावरे अवकाळी पावसाच्या महापुरामध्ये वाहून गेली तर काही मृत पावली त्यामुळे त्या शेतकऱ्यांच्या संसाराचा आर्थिक कणाच कोलमडून पडला. त्यामुळे अशा शेतकऱ्यांना पुन्हा नव्याने उभा राहण्यासाठी दुपती जनावरे द्यावी, अशी संकल्पना त्यांनी मांडली.

अर्थात, दरवर्षी दिवाळीनिमित्त शिवसेना पक्षाचे नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सरनाईक कुटुंबाकडून विशेष भेट दिली जाते. यावेळी धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री पदाची जबाबदारी देणाऱ्या आपल्या नेतृत्वाला आगळया-वेगळ्या उपक्रमाच्या माध्यमातून भेट द्यावी या उद्देशाने ज्या शेतकऱ्यांची दुभती जनावरे महापुरामध्ये वाहून गेली, अशा शेतकऱ्यांना आर्थिक पाठबळ देण्याकरिता त्यांच्या उपजीविकेचे साधन म्हणून १०१ दुभती गोवंश जनावरे भेट देऊन शेतकरी कुटुंबांच्या जीवनात नवचैतन्य फुलविण्याचा संकल्प या कार्यक्रमातून प्रत्यक्षात उतरवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला असल्याचे प्रतिपादन मंत्री सरनाईक यांनी केले.

या प्रसंगी बोलताना मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, आसमानी संकटाने शेतकऱ्यांचे संसार उद्ध्वस्त झाले - पिकं, भांडीकुंडी, संसारातील लहानसहान वस्तूंसह त्यांच्या उपजीविकेचा आधार असलेली जनावरंही वाहून गेली. शेतकऱ्यांचा संसार पुन्हा उभा राहावा, म्हणून आम्ही त्यांना दुधाळ गोवंश भेट म्हणून देत आहोत. या जनावरांच्या माध्यमातून त्यांचा संसार नव्याने बहरो, हीच आमची खरी दिवाळी भेट आहे. ते पुढे म्हणाले, शेतकऱ्यांचा संसार फक्त सरकारी मदतीवर उभा राहणार नाही. आपण सर्वांनी समाजभावनेतून पुढे येऊन त्यांना हात द्यावा. कारण शेतकऱ्याला उभं करणं म्हणजे आपल्या भूमीचं, आपल्या अन्नदात्याचं पुनर्जन्म घडवणं आहे.

या अनोख्या दिवाळी उपक्रमामुळे धाराशिवच्या शेतकऱ्यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू आहेत. काळ्या ढगांनी व्यापलेले आकाश आता उजळले आहे - आशेचा दीप पुन्हा पेटला आहे.

ही फक्त दिवाळी भेट नाही, तर एका उद्ध्वस्त संसाराला पुन्हा सजीव करण्याचा पवित्र संकल्प आहे, असं या उपक्रमाचं सार सांगत धाराशिव जिल्ह्यातील शेतकरी आता नव्या उमेदीनं नवजीवनाचं स्वागत करत आहेत.

## क्राईम न्युज

### ट्रकवर चढून तुर डाळीचे वीस कट्ट्याची चोरी

येरमाळा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे- संजय श्याम गोलकर, वय ४३ वर्षे,रा. विल कोडला जावीर ता. भिकनगांव जि. खरगोन मध्य प्रदेश हे त्यांचे ताब्यातील ट्र क्र सीजी०८ए.यु ३८८२ मध्ये तुरडाळ कट्टे घेवून जात असताना दि.१९.१०.२०२५ रोजी ०५.०० वा. सु.तेरखेडा गावाजवळील पारधी पिढीसमोर रोडवर अज्ञात व्यक्तीने चालते ट्रक वर चढून ट्रक वरील दोरी व कपडा फाडून आत मध्ये उतरुन ट्रक मधील २० कट्टे तुरदाळ चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-संजय गोलकर यांनी दि.१९.१०.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन येरमाळा पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०५(ब) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### वजेची तारेचा ड्रम चोराने पळविला

कळंब (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत दि.१४.०८.२०२५ रोजी रोजी ०९.३० वा. सु. डिकस एम आय डी सी येथील गोडाउन गाळा क्र ७ बी समोर डिकसळ येथे अशोका बिल्डकॉन कंपनीचे अंतर्गत सक्षम कंट्रक्षणचे गोडावून गाळा नं ७ बी समोर ठेवण्यात आलेले ए.ए.ए. सी डॉग कंडटर ८.१६० किमी विजेची तारेचा ड्रम, ए.ए.ए.सी डॉग कंडटर ६.१०० किमी विजेची तारेचा ड्रम असा एकुण ६५,००० किंमतीचा कंट्रकक्षणचे साहित्य अज्ञात व्यक्तीने चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-अतुल पवार यांनी दि.१९.१०.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन कळंब पो ठाणे गुन्हा नोंदवला आहे.

### पोलिसांनी केली 'तडजोड शुल्क'वसुल

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.१८ ऑक्टोंबर रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण १९७कारवाया करुन १,६३,००० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

## जीवन समृध्दीसाठी काया, वाचा अन् मनाची शुद्धी करा:बहुजन हिताय वसतिगृहातील शिबिरात धम्मचारी अनोमकीर्ती यांचे प्रतिपादन



उमरगा (प्रतिनिधी)- प्रत्येक मानवाचे जीवन समृद्ध करण्यासाठी भौतिक गोष्टीला तिलांजली देऊन काया, वाचा आणि मनाची शुद्धी करावी. धम्माचा मार्ग म्हणजेच प्रत्येकाच्या आनंदी, सुखी जीवन जगण्याचा मार्ग आहे. धम्माचे मार्गावर चालताना कोणासही दुःख होणार नसल्याची काळजी प्रत्येकांनी घ्यावी हेच समर्पित धम्मजीवनाचे मर्म आहे. पाच दिवस समर्पित धम्म जीवन जगण्याचा प्रत्येकांनी सराव करावा. धम्मचारी अनोमकीर्ती यांनी सांगितले.

शहरातील बहुजन हिताय विद्यार्थी वसतिगृहात त्रिरत्न बुद्धिस्ट सेंटरच्या वतीने ऐन दिवाळीमध्ये आयोजित पाच दिवशीय निवासी धम्म शिबिराचे उद्घाटन करण्यात आले यावेळी ते बोलत होते. धम्मपीठावर केंद्र चेअरमन धम्मचारी रत्नपालित, धम्मचारी प्रज्ञाजित, धम्मचारी ज्ञानपालित, धम्म-चारी संमतबंधू, धम्मचारी असंगवज्र, धम्मचारी धम्मभूषण, धम्मचारी विबोध,धम्मचारी जिंनघोष आदींची उपस्थिती होती. प्रारंभी शिबिरात दाखल झालेल्या ६० शिबिर्थीचे स्वागत करण्यात आले. पाली पूजेचे नेतृत्व धम्मचारी ज्ञानपालित यांनी केले.

यावेळी तथागत सम्यक समबुद्धाच्या मूर्तीचे व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. धम्मचारी रत्नपालित यांनी प्रास्ताविक केले. धम्मचारी ज्ञानपालित यांनी सूत्रसंचालन केले. धम्मपालन गाथेने सांगता करण्यात आली या शिबिरासाठी मारुती कांबळे, वगरसेन कांबळे, उत्तम गायकवाड, प्रियदर्शी कांबळे, मंकावती कांबळे, तेजस्विनी गायकवाड,राजेंद्र कांबळे, सुनील कांबळे, संतोष दलाल, जी एल कांबळे, अजय गायकवाड आदी परिश्रम घेत आहेत.

मनोविकासासाठी मन करा रे प्रसन्न सर्व सिद्धीचे कारण... शिबिरार्थींना संबोधित करतांना अनोमकीर्ती म्हणाले, प्रत्येक मानवाचा मानसिक विकास होणे आवश्यक आहे. त्यांच्या आनंदाचा निर्देशांक हा धार्मिक जीवनाचे विकासात दडला आहे. माणसे दुःखी असताना देश प्रगती करतोय असे म्हणण्यात अर्थ नाही. सर्वच माणसे निर्मळ मनाने जगतील तेंव्हा प्रगतीचा आलेख वाढेल. संत तुकाराम महाराजांच्या उक्ती प्रमाणे नाही निर्मळ जीवन काय करील साबण, मन करा रे प्रसन्न सर्व सिद्धीचे कारण म्हणून माणसाची मने निर्मळ करण्याचे प्रशिक्षण धम्म शिबिरात होते. जेंव्हा शिबिराच्या माध्यमातून आपण समर्पित जीवन जगतो तेंव्हा आपल्या जगण्याचा अर्थ कळतो सुख पाहता जवा एवढे दुःख पर्वता एवढे हे पर्वता समान दुःख नाहीसं करण्यासाठी भगवान बुद्धांनी आर्य आष्ठागिक मार्ग सांगितला असून त्याचे पालन करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे असे ते म्हणाले.

## पुण्यातील जावयांकडून २८० ब्लँकेटचे वाटप:परंड्यातील नऊ गावांमधील पूरबाधितांच्या मदतीसाठी राबवला उपक्रम, मुलांनाही दिले कपडे

परंडा (प्रतिनिधी)- तालुक्यातील पुरग्रस्तांना थंडीवर मात करण्यासाठी बेदमुथा परिवाराचे पुण्यातील जावई मंडळीनी गरजूंसाठी उबदार वस्त्र वाटप केले.

परंडा येथील बेदमुथा परिवाराचे पुणेस्थित जावई मंडळी बोरा, लुंकड आणि देसडला परिवार यांनी सामाजिक बांधिलकी आणि मानवतेची जाणीव जपत परंडा तालुक्यातील नऊ गावांतील गरजूंना २८० उबदार ब्लँकेटचे वाटप करून सामाजिक आदर्श घालून दिला आहे. सप्टेंबर महिन्यात धाराशिव जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीनंतर आता परिसरात थंडीचे प्रमाण वाढत असल्याने गरजू कुटुंबांना उबदार संरक्षण देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबवण्यात आला. आरणगाव (३५), कारंजा (३५), पारेवाडी ( ३५), कार्ला (५०), पिंपरखेड (३५), पवारनगर (२३), श्रीधरवाडी (३२), परंडा ( १०) आणि कंडारी (२५) या नऊ गावांतील एकूण २८० लाभार्थींना ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. या कार्यासाठी ब्लँकेटचे संच परंडा येथील लक्ष्मी मेडिकलचे मालक राकेश बेदमुथा यांच्या माध्यमातून उपलब्ध झाले. बेदमुथा परिवाराचे पुण्यातील जावई मंडळी नेहमीच समाजकार्यासाठी आघाडीवर असतात.

शिक्षकांनी केली मदत उपक्रमासाठी पवारनगर शाळेचे शिक्षक विनोद सुरवसे यांनी स्थानिक समन्वयक म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. गावागावातील शिक्षकांच्या मदतीन ब्लँकेट शाळांतील विद्यार्थ्यांपर्यंत आणि गावातील वृद्ध गरजू व्यक्तीपर्यंत पोहोचवले.

## धाराशिव शहरासह जिल्ह्यात बरसात; बाजारामध्ये तारांबळ: ग्राहकांसह विक्रेत्यांचीही झाली धावपळ



धाराशिव--शहारासह तालुक्यातील चिखली, तेर, ढोकी, नितळी, आळणी, इर्ला, बेंबळी, रुईभरसह जिल्ह्याच्या अन्य काही भागात जोरदार पाऊस झाला. मंगळवारी दुपारी चार वाजेच्या दरम्यान धाराशिव शहरात अचानक जोरदार पावसाच्या सरी बरसल्या. त्यामुळे धाराशिव बाजारपेठेसह छत्रपती शिवाजी महाराज चौक, राजमाता जिजाऊ चौक, नेहरू चौकासह प्रमुख बाजारपेठेत लक्ष्मीपूजनाच्या खरेदीसाठी आलेल्या ग्राहकांसह विक्रेत्यांची तारांबळ उडाली. शहरात सोमवारी दुपारपर्यंत ऊन होते. उकाडा वाढला होता. त्यानंतर दुपारनंतर अचानक वातावरण बदलले. जोरदार पावसामुळे शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक रस्त्यावर ठिकठिकाणी पाणी साचले होते. या पाण्यातून वाट काढताना धाराशिवकरांना मोठी कसरत करावी लागली. बसस्थानक परिसरातही जोरदार पावसाचे पाणी वाहत होते. तसेच शहराच्या अंतर्गत भागासह समतानगर परिसरातील एचडीएफसी बँकेच्या समोरील रस्त्यावरही चिखल व पाणी साचले होते. छत्रपती शिवाजी महाराज चौक व सराफा बाजारपेठेत वाहतूक कोंडी झाली होती.

अजूनही २ नोहेंबरपर्यत जिल्ह्यात पावसाची शक्यता हवामान अभ्यासक सूरज जाधव यांनी वर्तवली आहे.

## उमरगा तालुक्यात महामार्गावर अपघात:सर्व मृत कर्नाटकचे, धुक्यामुळे कार दुभाजक ओलांडून दुसऱ्याकारला भिडली ; देवदर्शनाहून परतणारे चार ठार

येणेगूर(प्रतिनिधी)-उमरगा तालुक्यातील दाळिंबजवळ राष्ट्रीय महामार्गावर दोन कार समोरासमोर धडकल्याने कर्नाटक येथील चौघांचा दुर्दैवी मृत्यू झाला. तर दोघे गंभीर जखमी झाले. ही घटना मंगळवारी ( २१ ऑक्टोबर) सकाळी साडेसातच्या सुमारास घडली. धुक्यामुळे काहीच न दिसल्याने एक कार दुभाजकावर चढून दुसऱ्या बाजूने येणाऱ्या कारला धडकली.

दीपावलीनिमित्त कर्नाटकातील भाविक ग्रँड विटारा कारने (केए ३८, एम ९९४६) हुलजंती (ता. मंगळवेढा, जि. सोलापूर) येथील महालिंगरायाचे दर्शनासाठी गेले होते. परतत असताना उमरगा तालुक्यातील दाळिंब व शिवाजीनगर तांड्यादरम्यानच्या पेट्रोल पंपाजवळ कार आली. तेव्हा समोरून उमरगा येथून सोलापूरच्या दिशेने भरधाव टाटा सफारी कार (एमएच १४, इपी ०७३२) येत होती. त्या वेळी या कारच्या चालकाचा ताबा सुटला. यामुळे सफारी कार दुभाजकास धडकून हवेत उडुन दुभाजक ओलांडून समोरून येणाऱ्या ग्रँड विटारा कारवर आदळली. यात ग्रँड विटारातील चौघा भाविकांचा जागीच मृत्यू झाला. यात रतिकांत मारूती बसगौडा ( ३०), शिवकुमार चितानंद वग्गे (२६), संतोष बजरंग बसगौडा (२०), सदानंद मारूती बसगौडा (१९, चौघे रा. खाशमपुर पी, ता. जि. बिदर) यांचा समावेश आहे. विटाराचा चालक दिगंबर जगन्नाथ संगोळगी (३१, रा खाशमपुर पी) व सफारी चालक लावण्य हणमंत मसूती (२२, रा. सोलापूर) दोन्ही चालक गंभीर जखमी झाले आहेत. अपघातात विटारा कार अक्षरशः चेंदामेंदा होून महामार्गाच्या बाजूच्या खड्ड्यात जून पडली होती. यातील एक प्रवासी बाहेर फेकला गेला तर अन्य प्रवासी मध्येच दबून अडकून पडले होते. येणेगूर दूरक्षेत्रातील पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत जेसीबी व स्थानिकांच्या मदतीने अडकलेल्यांना बाहेर काढले. मृतांची उमरगा येथील उपजिल्हा रुग्णालयात उत्तरीय तपासणी करण्यात आली. दोन्ही चालकांवर प्रथमोपचार करून एकास बिदर व एकास सोलापूर येथे हलवण्यात आले आहे.

महामार्ग प्राधिकरणाचा हलगर्जीपणा

महामार्ग प्राधिकरणाच्या हलगर्जीपणामुळे या महामार्गाची दुरवस्था झाली आहे. बहुतांश भागातील पथदिवेही बंद अवस्थेत आहेत. निकृष्ट दर्जाचे काम, त्यात पावसामुळे बहुतांश ठिकाणी रस्ता उखडला गेला आहे. खराब रस्त्यामुळे मागील चार दिवसात दहा किलोमीटरमध्येच तीन भीषण अपघात झाले आहेत. यात येळी जवळ तीन जणांचा मृत्यू झाला. रामपुर पाटीजवळ एक, जकेकुरजवळ एकाच्या पायाला गंभीर दुखापत झाल्याने कायमचे अपंगत्व आले तर मंगळवारच्या अपघातात चार जणांना आपला जीव गमवावा लागला आहे.

मी सोलापूरला खरेदीसाठी जात होतो. मात्र, अचानकच मोठा आवाज आला. सुरुवातीला दोन कारची धडक बसल्याचे समजले. सुरुवातीला वाटले की, काहीतरी लहानमोठा अपघात असेल. परंतु, जवळ जाऊन पाहिल्यावर अपघाताची भीषणता लक्षात आली. तेथील दृश्य पाहिल्यानंतर मन्न सुन्न झाले. कारमधून एक व्यक्ती बाहेर पडली होती. आतमध्ये काहीजण अडकलेले होते. पोलिस व काहीजणांच्या मदतीने त्यांना बाहेर काढले तर त्यांचा जीव गेलेला दिसून आला. सर्वांचे शरीर रक्ताने माखलेले होते. चालक कण्हत होता. त्याला उपचारासाठी पाठवले. अपघातानंतरही धुक्याचे वातावरण होते. धुके असल्यामुळेच हा अपघात झाला आहे.

## सोयाबिनचे २२ कट्टे अतिक्रमण करुन चोरुन नेले

शिराढोण (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसासकडून समजलेली की, फिर्यादी श्रीराम उत्तम लोमटे, वय २९ वर्षे, रा. माळकरंजा ता. कळंब जि. धाराशिव ह.मु. मुरुड ता. जि. लातुर यांचे माळकरंजा शिवारातील शेत गट नं १५ मधील शेतातुन २२ कट्टे सोयाबीन १३ क्विंटल एकुण ५२,००० किंमतीचे हे दि. १५.१०.२०२५ रोजी उध्दव गणपती लोमटे, भागवत गणपती लोमटे, उषा भागवत लोमटे रा. माळकरंजा ता. कळंब जि. धाराशिव यांनी अतिक्रमण करुन चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी श्रीराम लोमटे यांनी दि.१६.१०.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन शिराढोण पो ठाणे येथे अन्वये गुन्हा नोंदवला आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## पाकिस्तानी संरक्षण मंत्र्याची धमकी

पाकिस्तान असा देश आहे की, तो सतत भारताला डवचत आला आहे. आता तर भारत आणि आफगाणीस्तानला पाक संरक्षण मंत्र्यांनी धमकी दिली आहे. पाकिस्तानी सैन्य युद्धासाठी सज्ज आहे. याचा अर्थ अंगात खुमखूमी दिसून येत आहे. ऑपरेशन सिंदूरच्यावेळी भारतीय सैन्यांनी पाकव्याप्त काश्मीर मधील अतिरेक्यांचे कॅम्प उद्धस्थ केले. अनेक अतिरेकी मारले गेले. विमानतळाचे नुकसान झाले. पाकव्याप्त अतिरेकी कॅम्पस उद्धस्थ केल्यानंतर या भागात स्मशानशांतता होती. अनेक बाबी पाकिस्तानला कळाल्या आहेत. भारतीय जवानाची धाडसी कारवाई पाहुन देखिल गुर्मी असून दिसून येते. आज पर्यंत पाकिस्तानला भारताविरोधात समोरासमोर लढण्यात यश आले नाही. त्यामुळे छुपे युद्ध करीत आला आहे. काही झाले तरी भारतासमोर टिकाव लागणार नाही. हे ओळखून आहे. ऑपरेशन सिंदुर पुन्हा होणार या भितीपोटी अनेक पाकिस्तानी जपान सुट्टीवर गेले होते. भारताची धडकी पाकिस्तानी सैन्य दलांना आहे हे उघड आहे. असे असून सुद्धा पाकिस्तानी संरक्षण मंत्र्यांनी आम्ही भारताविरोधात लढण्यासाठी तयार आहोत असे उसणे आवसान आणून बोलणे किती बालिशपनाचे आहे हे उघड दिसून येते. पाकिस्तान हा अतिरेकी पोसणारा देश आहे. अतिरेक्यांना जे प्रशिक्षण दिले जाते पाकसैन्यदल देतात हे उघड आहे. आज पर्यंत जेवढे पाकिस्तानी अतिरेकी पकडले गेले ते पाक सैन्यदलाचे प्रशिक्षण घेतलेले होते. अतिरेक्यांना अत्याधुनिक शस्त्र शिकविले जाते. त्यांचे ब्रेनवॉश करून भारताविरोधात लढण्यात सज्ज केले जाते. त्यामुळे पाकिस्तान हा भारताचा कधीही मित्र होऊ शकत नाही. भारताने अनेक वेळा मित्रत्वाचा हात पुढे केला. सर्वाधिक प्रयत्न हे माजी पंतप्रधान दिवंगत अटलबिहारी बाजपायी यांनी केले तरी यश आले नाही. त्यामुळे पाकिस्तानला अद्दल घडविल्याशिवाय दुसरा पर्याय नाही. त्याच प्रमाणे पाकिस्तानची सध्याची आर्थिकस्थिती नाजूक आहे. अशा स्थितीत पाकचे संरक्षण मंत्री दम देतात हे किती दुर्देवी बाब आहे. भारत आणि आफगाणिस्थानचे संबंध सुधारत असताना पाकिस्तानच्सा पोटात दुखत आहे. तसे पाहिले तर पाकिस्तानचे काहीही स्थैर्य बाब नाही. उलट भारताशी मैत्रीपुर्ण संबंध ठेवणे फायद्याचे आहे. असे असताना जम्मू-काश्मीरात घुसखोरी करणे किती वाईट बाब आहे. पाकिस्ताने वेळीच स्थिती ओळखुन चालले पाहिजे. भारत हा महासत्ताधिश बनण्याकडे वाटचाल सुरु आहे. रशियाशी चांगले संबंध आहेत. अमेरिका भारताचे पंतप्रधान मोदीजी यांना मित्र मानतो आहे. जगात भारताची शान व मान वाढत असताना, भारताशी वैर निर्माण करणे योग्य नाही. केंद्रात भाजपाचे सरकार नव्हते तेंव्हा मतासाठी अधिकाराचा वापर होत नव्हता, आता भाजपाचे सरकार सत्तेत तिसऱ्यांदा आल्याने तरी पाकिस्ताने आपली चाल ओळखण्याची गरज आहे. पाकिस्तानची आजची स्थिती पाहाता व भारताने नुकतेच ऑपरेशन सिंदूरची यशस्वी कारवाईचा विचार केला पाहिजे. भारताने देखिल आता मवाळ धोरणा स्विकारण्याचे सोडून दिले पाहिजे. जशासतसे उत्तर दिले पाहिजे. तरच पाकिस्तान वटणीवर येऊ शकेल. यापूर्वी जम्मूकाश्मीरात काय दिसून येत होते. किती प्रमाणात घुसखोरी होती. भारतीय जवानास लक्ष्य केले जात होतो. शेकडोंच्या संख्येने भारतीय जवान शहीद झाले आहेत. हिंदुंची हत्त्या मोठ्या प्रमाणात करण्यात त्यावेळी भारतातील कोणत्याही राजकिय पक्षाने आवाज उठविला नाही. अनेक हिंदुचे जम्मूकाश्मीरातून स्थलांतर झाले त्यावेळीही आवाज उठविला नाही. एकंदर भारतात सत्ता परिवर्तन झाल्यास जम्मू-काश्मीरातील स्थिती बदलली आहे ही वस्तूस्थिती जाणून घेतली पाहिजे. देशात घुसखोरी बरोबर बॉम्बस्फोटाच्या घटना बंद झाल्या. भारतात घुसून हिंसा घडविण्याचे प्रकार बंद झाले ही बाब देशात सत्ता परिवर्तन झाल्यास घडली आहे या बाबीचा शांत डोक्यांनी विचार केला पाहिजे. देशाची सुरक्षाबाबत ज्योवळी चिंतन होते त्यावेळी सर्वांनी सत्ताधारी सरकारला सहकार्य केले पाहिजे. विनाकारण विरोधासाठी विरोध करणे योग्य नाही. त्यामुळे वेळीच काही बाबी विचारात घेऊन विरोधकांनी विचार बदलणे गरजेचे आहे. पाकिस्तान कदापी भारताचा मित्र होऊ शकत नाही. भारताशी सदैव वैर मनात ठेवणारा पाकिस्तान आहे हे आता पर्यंतच्या अनेक बाबीवरून दिसून येते. त्यामुळे भारतीयांनी एक बाब लक्षात ठेवावी की, सतत पाकिस्तानपासून सतर्क राहिले पाहिजे. पाकिस्ताने हा आज पर्यंत त्रात देत आला आहे. जेंव्हा भारताने पाकिस्ताना भूभाग दिला तेंव्हा पासून भारताला शत्रू मानणारा पाकिस्तान आहे. भारतीयांनी केवळ विचार केलेला बरा की, आज पर्यंत पाकिस्तानकडून कोणता फायदा झाला. सतत त्रास व हिंसा पदरी पडली आहे. हिंसाने कांही ही साध्य होत नाही हे उघड असताना पाकिस्तानमध्ये जन्मलेल्या मुलावर, भारताविरोधी संस्कार घडविले जातात याचे परिणाम भारत भोगत आला आहे. त्यामुळे भारतीयांनी सुद्धा पाकसारखे धोरणाचा अमल केला पाहिजे. पहलगाम घटना घडल्यावर तरी भारतीयांचे डोळे उघडले पाहिजेत. तसे होत नाही. भारतीया झालेला अन्याय तातडीने विसरतात. भारतीयांच्या मनात कपट नाही. निर्मल मनाचे भारतीय आहेत. त्याचाच लाभ पाकिस्तानी उचलत आहे. भारतीयावर नाव, जात विचारून गोळ्या घातल्या जात आहेत. नव विवाहीतेस सोडले नाही. नव विवाहतेस विधवा बनविणारे पाकिस्तानी अतिरेकी आहेत. असे असताना पाकिस्तानेचे संरक्षण मंत्री उलट भारताला दम देतात. युद्ध करण्याचे आव्हान देतात. भारतीय सैन्य पेटून उठले तर काय होईल? जगाच्या नकाशावरून पाकिस्तान दिसणार नाही. त्यावेळी अमेरिका काय कोणताही देश पाकिस्तानला मदत करणार नाही. ही बाब लक्षात घेता पाकिस्ताने वाटचाल असावी.

# भारतातील सात नद्यांबद्दल संपूर्ण माहिती

भारतीय इतिहासाच्या शतकानुशतके, काळ असंख्य वेळा बदलला आहे, परंतु देशातील नद्यांचा मार्ग आणि महत्त्व अपरिवर्तित राहिले आहे. त्यांच्या संबंधित दिशेने वाहणाऱ्या नद्या त्यांची शुद्धता राखत वाहत राहिल्या आहेत. सनातन धर्मानुसार, नद्या केवळ पाण्याचे माध्यम नाहीत; त्यांची देवी म्हणूनही पूजा केली जाते आणि विविध धार्मिक विधी आणि श्रद्धांचे केंद्रबिंदू आहेत.

प्राचीन भारतीय संस्कृतीत, नद्या जगण्यासाठी आणि विकासासाठी महत्त्वपूर्ण होत्या. म्हणूनच, सप्तनदी किंवा सात पवित्र नद्यांची संकल्पना विकसित झाली. सनातन संस्कृती नद्या आणि पाण्याच्या सर्व स्रोतांचा आदर शिकवते, तर साद नद्या सर्वात पवित्र आणि पूजनीय मानल्या जातात. या सात नद्यांमध्ये गंगा, यमुना, सरस्वती, सिंधू, नर्मदा, गोदावरी आणि कावेरी यांचा समावेश आहे. या सात नद्या वेगवेगळ्या देवतांशी संबंधित आहेत. गंगा भगवान शिवाशी, यमुना भगवान कृष्णाशी, सरस्वती भगवान गणेशाशी, सिंधू भगवान हनुमानाशी, नर्मदा देवी दुर्गाशी आणि कावेरी भगवान दत्तात्रेयाशी संबंधित आहेत. हिंदू धर्मात या प्रत्येक पवित्र नद्यांचे स्वतःचे वेगळे महत्त्व आणि पौराणिक कथा आहेत. स्नान करताना सात नद्यांचे स्मरण करावे असे शास्त्रांमध्ये सांगितले आहे.

पवित्र नद्यांमध्ये स्नान केल्याने व्यक्तीचे सर्व पाप शुद्ध होतात आणि आरोग्य आणि समृद्धीचे आशीर्वाद मिळून पुण्य प्राप्त होते. असे मानले जाते की पवित्र नद्यांचे पाणी शरीराच्या संपर्कात आल्यावर, अंतरात्मा शांत करते, व्यक्तीच्या पापांपासून शुद्ध होते आणि त्याच्या जीवनातील नकारात्मक ऊर्जा काढून टाकते. मान्यतेनुसार, या पवित्र नद्यांमध्ये स्नान केल्याने ग्रहांची स्थिती देखील सुधारते. योगी आणि तपस्वींना त्यांच्या प्रार्थना आणि तपश्चर्येसाठी या नद्यांचे काठ विशेषतः इष्ट वाटले आहेत. प्राचीन काळी, अनेक ऋषी आणि तपस्वींनी या पवित्र नद्यांच्या पाण्यात समाधी घेतली होती, परंतु या नद्या इतर अनेक कारणांमुळे देखील महत्त्वपूर्ण आहेत. या लेखात आपण सात नद्यांबद्दल तपशीलवार जाणून घेऊया...

### गोदावरी नदी

हिंदू पौराणिक कथांमधील सात पवित्र नद्यांमध्ये गोदावरी नदीचा उल्लेख केला जातो. गंगा आणि यमुना सोबतच, गोदावरीला भारतात खूप महत्त्व आहे. ही नदी उत्तर आणि दक्षिण भारतातील संस्कृतींचा संगम आहे. दर बारा वर्षांनी गोदावरीच्या काठावर पुष्करम नावाचा एक मोठा स्नान उत्सव आयोजित केला जातो. लाखो भाविक तिच्या पाण्यात पवित्र स्नान करतात तेव्हा ही एक महत्त्वाची घटना आहे. ही पवित्र नदी महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वरजवळ मध्य भारतातील पश्चिम घाटात उगम पावते आणि आंध्र प्रदेशातील पश्चिम गोदावरी आणि पूर्व गोदावरी जिल्ह्यांमधून वाहते आणि बंगालच्या उपसागरात वाहते. गंगेनंतर, ही देशातील दुसरी सर्वात लांब नदी आहे (१,४६५ किलोमीटर). त्र्यंबकेश्वर, भद्राचलम आणि नांदेड सारखी प्रमुख तीर्थस्थळे तिच्या काठावर आहेत.

### गोदावरी नदीचा उगम

गोदावरी नदीच्या उगमाशी संबंधित अनेक पौराणिक कथा आहेत. पौराणिक कथेनुसार, जेव्हा महर्षी गौतम यांच्यावर गोहत्येचा खोटा आरोप लावण्यात आला तेव्हा ते एका जंगलात गेले आणि भगवान शिवाची पूजा करू लागले. महर्षी गौतम यांचा संकल्प इतका प्रबळ होता की त्यांनी सूर्य, उष्णता, थंडी, पाऊस किंवा वन्य प्राण्यांपासून विचलित न होता तपश्चर्या सुरू ठेवली. त्यांच्या भक्ती आणि कठोर तपस्येमुळे, त्यांनी आपले निवासस्थान म्हणून निवडलेला जंगलाचा भाग दिव्य तेजाने तेजस्वी झाला. त्यांच्या भक्तीने प्रसन्न होऊन, भगवान शिव त्यांच्यासमोर प्रकट झाले आणि त्यांना त्यांचे इच्छित वरदान देण्यास सांगितले. त्यानंतर त्यांनी भगवान शिवांना म्हटले, प्रभु, जर माझी भक्ती खरी असेल तर कृपया देवी गंगा येथे नदीच्या रूपात पाठवा, जेणेकरून माझ्यावरील गोहत्येचा आरोप खोटा ठरेल. भगवान शिव म्हणाले, हे गौतम ऋषी, देवी गंगा आधीच पृथ्वीवर आहे आणि ती तिथून हलू शकत नाही. तथापि, देवी गंगेच्या जागी, देवी गोदावरी येथे ब्रह्मगिरी पर्वतातून उगम पावणाऱ्या नदीच्या रूपात वास करेल. शिवाच्या शब्दांनंतर, देवी गोदावरी नदीच्या रूपात वाहत तेथे प्रकट झाली आणि तिने महर्षी गौतमला तिच्या थंड आणि पवित्र पाण्याने सांत्वन दिले. गौतम ऋषींशी असलेल्या तिच्या सहवासामुळे तिला गौतमी असेही म्हणतात.

### कावेरी नदी

सात नद्यांमध्ये कावेरी नदीला विशेष स्थान आहे. ती तामिळनाडू आणि कर्नाटकात तिच्या जीवनदायी गुणधर्मांसाठी प्रसिद्ध आहे. कावेरी नदी भगवान दत्तात्रेयाशी संबंधित आहे. भूमीचे पोषण करण्यासाठी देवी कावेरीला पृथ्वीवर कसे आणले गेले याबद्दल आख्यायिका सांगतात. आई कावेरीचे उगमस्थान पश्चिम घाटातील ब्रह्मगिरी पर्वत असल्याचे मानले जाते. आग्नेय दिशेने वाहणारी कावेरी नदी बंगालच्या उपसागरात वाहते. कावेरी नदी प्राचीन काळापासून वाहत आहे. कावेरी ही भगवान ब्रह्माची कन्या आहे आणि तिला गंगा देवीसारखे पूज्य मानले जाते. तिच्या काठावर अनेक हिंदू धार्मिक स्थळे आहेत, त्यापैकी प्रमुख म्हणजे तिरुचिरापल्ली. कावेरीला दक्षिण भारताची जीवनरेखा असेही म्हणतात. या कारणास्तव, तिला दक्षिणेची गंगा असेही म्हणतात आणि असे मानले जाते की त्यात स्नान केल्याने अनेक जन्मांचे पाप नष्ट होतात.

### कावेरी नदीचा उगम

कावेरी नदीच्या उगमामागे अनेक वेगवेगळ्या कथा आहेत. एका कथेनुसार, प्राचीन काळी दक्षिण भारतातील दुष्काळामुळे या प्रदेशातील परिस्थिती बिकट होत चालली होती. या परिस्थितीमुळे अगस्त्य ऋषींना खूप दुःख झाले आणि त्यांनी मानवजातीला या परिस्थितीवर मात करण्यास मदत करण्यासाठी भगवान ब्रह्मदेवाकडे प्रार्थना केली. ब्रह्मदेव म्हणाले की जर तुम्ही भगवान शिव जिथे राहतात त्या ठिकाणी जाऊन बर्फाचे पाणी गोळा केले तर तुम्ही एक नवीन नदी निर्माण करू शकता जी कधीही कोरडी पडणार नाही. ब्रह्मदेवाचे हे शब्द ऐकून, अगस्त्य ऋषी कैलास पर्वतावर गेले, त्यांनी त्यांचे भांडे बर्फाच्या पाण्याने भरले आणि परत आले. त्यांनी पर्वतीय कुर्ग प्रदेशात नदी सुरू करण्यासाठी योग्य जागा शोधण्यास सुरुवात केली. जेव्हा अगस्त्य ऋषी योग्य जागा शोधून थकले तेव्हा त्यांनी त्यांचे भांडे एका लहान मुलाला दिले आणि थोडा वेळ विश्रांती घेतली. ऋषींनी ज्या मुलाला भांडे दिले ते दुसरे तिसरे कोणी नसून अडथळे दूर करणारे भगवान गणेश होते, जे त्यांच्या भक्तांचे दुःख कमी करण्यासाठी आले होते. त्यानंतर भगवान गणेश अगस्त्य ऋषींना ब्रह्मगिरी पर्वतावर घेऊन गेले, जिथे नदी वाहू लागली. असे मानले जाते की त्यात स्नान केल्याने अनेक जन्मांच्या पापांपैकी एक पाप नष्ट होते.

कावेरी नदी ही भारतातील एक पवित्र नदी आहे आणि इतर नद्यांप्रमाणेच तिचे धार्मिक महत्त्व आहे. भारतात लोक गंगा आणि यमुनाप्रमाणेच कावेरी नदीला देवी मानतात आणि तिची पूजा करतात. तिला देवी कावेरी अम्मा असे संबोधले जाते. आख्यायिका अशी आहे की कावेरी नदी आपले कर्म शुद्ध करते आणि आपले सर्व दुःख धुवून टाकते. ही नदी आई म्हणून पूजनीय आहे आणि आपल्याला शांती देते.

### सिंधु नदी

प्राचीन भारतीय ग्रंथांमध्ये सिंधू म्हणून ओळखली जाणारी सिंधू नदी हिंदू पौराणिक कथा आणि इतिहासाचा केंद्रबिंदू आहे. ती पाकिस्तान आणि उत्तर भारतातून वाहते. ऐतिहासिकदृष्ट्या सुरुवातीच्या सिंधू संस्कृतीचा उगम तिच्या काठावर झाला. सिंधू नदीचा उल्लेख सर्वात जुना वैदिक ग्रंथ ऋग्वेदात देखील आढळतो, जो प्राचीन काळापासून हिंदू संस्कृतीत तिचे महत्त्व दर्शवितो. भारताचे नाव, हिंदुस्तान, ही देखील सिंधू नदीशी जोडलेली एक कथा आहे. सिंधू नदी पश्चिम तिबेटमध्ये उगम पावते आणि काश्मीरच्या लडाख आणि गिलगिट-बाल्टिस्तान प्रदेशातून वायव्येकडे वाहते. तिच्या उगमापासून, सिंधू नदी तिबेट पठारावरील एका विस्तृत दरीतून वाहते, काश्मीर सीमा ओलांडते आणि कराचीच्या दक्षिणेस अरबी समुद्रात वाहण्यापूर्वी पाकिस्तानच्या वाळवंट आणि सिंचित जमिनीतून नैऋत्येकडे वाहते.

असे मानले जाते की वैदिक धर्म आणि संस्कृती या नदीकाठी उगम पावली आणि भरभराटीला आली. वाल्मिकीच्या रामायणात, सिंधूला महानदी असे संबोधले जाते. सिंधू नदीचा उल्लेख जैन ग्रंथ, जंबुद्वीप प्रज्ञापतीमध्ये देखील आहे. सिंधू नदीने भूतकाळात अनेक वेळा आपला मार्ग बदलला आहे.

सिंधू नदीच्या धार्मिक महत्त्वाबद्दल बोलायचे झाले तर, भारतीय संस्कृती आणि सभ्यतेचे संगोपन करणाऱ्या या नदीच्या काठावर अनेक ऋषी-मुनींनी तपस्या केली. धार्मिक श्रद्धेनुसार या नदीच्या काठावर बसून अनेक वेद आणि पुराणे देखील रचली गेली. ऐतिहासिकदृष्ट्या, या नदीचे उगमस्थान कैलास पर्वताच्या उत्तरेस अंदाजे पाच हजार मीटर उंचीवर असल्याचे मानले जाते.

### नर्मदा नदी

गंगा आणि यमुना प्रमाणेच नर्मदा नदीलाही हिंदू धर्मात पवित्र मानले जाते. नर्मदा नदी देवी दुर्गाशी संबंधित आहे, ज्यामुळे ती हिंदू धर्मातील सात पवित्र नद्यांपैकी एक बनते. असे मानले जाते की नर्मदा नदीत स्नान केल्याने गंगेत स्नान करण्याइतकेच पवित्रता आणि पुण्य मिळते. नर्मदा नदीतील प्रत्येक खडा भगवान शिवाच्या समतुल्य मानला जातो आणि या नदीतील प्रत्येक खडा आणि दगड नर्मदेश्वर महादेव म्हणून पूजला जातो. धार्मिक श्रद्धा आणि पौराणिक कथेनुसार, या नदीला प्रदक्षिणा घालणारे सर्व पापांपासून मुक्त होतात आणि मृत्यूनंतर मोक्ष प्राप्त करतात.

नर्मदा नदी, ज्याला आई रेवा आणि कुंवरी नदी असेही म्हणतात, ही मध्य प्रदेशातील जीवन देणारी नदी आहे, जी अमरकंटकमध्ये उगम पावते. नर्मदा मैकल पर्वतातून उगम पावते आणि पश्चिमेकडे वाहते आणि खंभातच्या आखातात विलीन होते. नर्मदा नदीला मातेचा दर्जा देण्यात आला आहे. नदीच्या उगमस्थानी एक मंदिर देखील बांधले आहे जे तीर्थक्षेत्र म्हणून प्रसिद्ध आहे.

### नर्मदा नदीचा उगम

नर्मदा नदीच्या पृथ्वीवर अवतरण्याची कथा स्कंद पुराणात आढळते. आख्यायिकेनुसार, राजा हिरण्य तेजाने आपल्या पूर्वजांच्या उद्धारासाठी चौदा हजार वर्षे कठोर तपस्या केली, भगवान शिव यांना प्रसन्न केले आणि नंतर नर्मदा नदीला पृथ्वीवर आणण्याचे वरदान मागितले. भगवान शिवाच्या आज्ञेनुसार, नर्मदा नदी मगरीवर स्वार होऊन उदयचल पर्वतावर उतरली आणि पश्चिमेकडे वाहू लागली. नर्मदा नदीच्या उगमाशी संबंधित अनेक आख्यायिका देखील आहेत, ज्या ठिकाणाहून आणि प्रदेशानुसार बदलतात.

### सरस्वती नदी

सरस्वती नदी ही प्राचीन हिंदू ग्रंथांमध्ये आणि ऋग्वेदात वर्णन केलेल्या प्रमुख नद्यांपैकी एक आहे. ऋग्वेद सरस्वतीचे वर्णन अन्नवती आणि उदकावती असे करतो. ऋग्वेद सरस्वती नदीचे वर्णन अंबितम (मातांमध्ये सर्वोत्तम), नादितम (नद्यांमध्ये सर्वोत्तम) आणि देवितम (देवींमध्ये सर्वोत्तम) असे देखील करतो. सरस्वती नदीला देवी सरस्वतीचे एक रूप मानले जात असे, ज्यामुळे तिचे धार्मिक महत्त्व आणखी वाढते. सरस्वती नदीचा उगम राजस्थानमधील अरावली पर्वतरांगांमध्ये असल्याचे मानले जाते. ती उत्तराखंडमधील बद्रीनाथजवळ उगम पावणाऱ्या अलकनंदा नदीची उपनदी असल्याचे म्हटले जाते. ऋग्वेदाच्या नाडी सूत्रातील एका मंत्रात सरस्वती नदी यमुनेच्या पूर्वेस आणि सतलजच्या पश्चिमेस वाहत असल्याचे वर्णन केले आहे. नंतरच्या वैदिक ग्रंथांमध्ये, जसे की तांड्य आणि जैमिनीय ब्राह्मण, नदी वाळवंटात कोरडी पडल्याचे वर्णन करतात.

महाभारतात वाळवंटातील श्विनाशन नावाच्या ठिकाणी सरस्वती नदीचे गायब होण्याचे वर्णन देखील केले आहे. महाभारतात, सरस्वती नदीला विविध नावे आहेत, ज्यात प्लक्षवती नदी, वेदस्मृती आणि वेदवती यांचा समावेश आहे. शिवाय, महाभारत, वायु पुराण आणि इतर पुराणांमध्ये सरस्वतीच्या विविध पुत्रांची नावे आणि त्यांच्याशी संबंधित मिथकांचा उल्लेख आहे. असे म्हटले जाते की प्राचीन काळी, सरस्वती नदी नेहमीच पाण्याने भरलेली होती आणि तिच्या काठावर भरपूर अन्न होते. पंजाबमधील सिरमूर राज्याच्या पर्वतीय प्रदेशात उगम पावणारी, ती अंबाला आणि कुरुक्षेत्रातून जात, कर्नाल जिल्हा आणि पटियाला राज्यात प्रवेश करते आणि सिरसा जिल्ह्यातील दृषद्वती (कांगर) नदीत विलीन होते. प्रयागजवळ, ती गंगा आणि यमुना नदीत विलीन होऊन त्रिवेणी बनते. कालांतराने ती या सर्व ठिकाणांहून नाहीशी झाली. तथापि लोकांचा असा विश्वास आहे की सरस्वती नदी अजूनही प्रयागमध्ये गुप्तपणे वाहते.

### सरस्वती नदीची उत्पत्ती

हिंदू पौराणिक कथेनुसार, सरस्वती नदी ही भगवान ब्रह्माची पत्नी मानली जाते, जी शापामुळे पृथ्वीवर अवतरली. असे म्हटले जाते की स्वर्गात वाहणारी दुधाळ नदी, सरस्वती नदी, मृत्यूनंतर मानवांसाठी मोक्षाचे प्रवेशद्वार आहे.

### सरस्वती नदी कशी नाहीशी झाली?

सरस्वती नदी कशी नाहीशी झाली याबद्दल शास्त्रांमध्ये एक कथा आहे. त्यानुसार एकदा वेद व्यास सरस्वती नदीच्या काठावर भगवान गणेशाला महाभारत सांगत होते. ऋषींनी नदीला मंद गतीने वाहू देण्याची विनंती केली जेणेकरून ते पठण पूर्ण करू शकतील. शक्तिशाली सरस्वती नदीने ऐकले नाही आणि तिचा वेगवान प्रवाह सुरूच ठेवला. या वर्तनामुळे संतप्त होऊन, भगवान गणेशाने नदीला शाप दिला की ती एके दिवशी नाहीशी होईल. आणि हेच नदी नाहीशी होण्याचे कारण मानले जाते.

प्रयागराजमध्ये, त्रिवेणी संगम (गंगा, यमुना आणि सरस्वतीचा संगम) आहे, जिथे फक्त स्नान केल्याने भक्तांचे पाप धुऊन जाते असे मानले जाते. वैज्ञानिकदृष्ट्या ही नदी हडप्पा संस्कृतीच्या काळात अस्तित्वात होती. खरं तर, या संस्कृतीचे अनेक महत्त्वाचे भाग सरस्वती नदीच्या काठावर बांधले गेले होते.

### यमुना नदी

यमुना नदी ही गंगेची सर्वात लांब आणि दुसरी सर्वात मोठी उपनदी आहे. तिचा उगम यमुनोत्री आहे. यमुनोत्रीला भेट दिल्याशिवाय यात्रेकरूचा प्रवास अपूर्ण आहे असे म्हटले जाते. तिच्या उगमापासून मैलभर मोठ्या खडकांवर आणि पर्वतांवरून वाहणारी, यमुना तिच्या वेगवान प्रवाहासह प्रयागराजमधील त्रिवेणी संगमावर पोहोचते, जिथे ती गंगेत विलीन होते. प्रादेशिक भाषांमध्ये, यमुनाला जमुना आणि जमना असेही म्हणतात. भारताची राजधानी दिल्लीभोवती असलेली, ही नदी दिल्ली आणि देशाच्या इतर अनेक भागांमधून वाहते. जरी ती उत्तर भारतातील एक प्रमुख नदी असली तरी, ती प्रामुख्याने उत्तराखंड आणि उत्तर प्रदेश राज्यांमधून वाहते. गंगेसोबतच ती देशातील सर्वात पवित्र नद्यांपैकी एक आहे.

यमुना नदीला हिंदू पौराणिक कथांमध्ये विशेष स्थान आहे. तिचा इतिहास भगवान श्रीकृष्णाच्या बालपण आणि तारुण्याशी जोडलेला आहे, जिथे त्यांनी अनेक दैवी कृत्ये केली.

पौराणिक कथेनुसार, यमुनेत स्नान केल्याने नकारात्मक प्रभाव दूर होतात आणि शरीर आणि मन शुद्ध होते, तसेच आध्यात्मिक आरोग्य सुधारते. यमुना नदीचा उल्लेख हिंदू धार्मिक ग्रंथ, ऋग्वेद आणि अथर्ववेदात प्रमुखपणे आढळतो.

### यमुना नदीची उत्पत्ती

महाभारतात, देवी यमुना सूर्यदेव आणि त्याची पत्नी, संजना (नंतरच्या साहित्यात संज्ञा) यांच्या पोटी जन्माला आल्याचे म्हटले जाते. यमुना ही यमराजाची जुळी बहीण आहे. धर्मग्रंथांमध्ये यमुनाला सूर्याचे आवडते अपत्य म्हणून वर्णन केले आहे, म्हणूनच तिला सूर्यतनय, सूर्यजा आणि रविनंदिनी असेही म्हणतात. आख्यायिकेनुसार पती सूर्याचे तीव्र किरण सहन न करता संजना उत्तर ध्रुवावर सावली म्हणून राहायला लागली. ताप्ती नदी आणि शनिदेव यांचा जन्मही या सावलीतून झाला असे मानले जाते. हळूहळू छाया यम आणि यमुनाला सावत्र वागणूक देऊ लागली. छायाच्या कृत्यांमुळे निराश होऊन, यमने एक नवीन शहर स्थापन केले, जे नंतर यमपुरी म्हणून ओळखले जाऊ लागले. यमपुरीमध्ये तिचा भाऊ यम पाप्यांना शिक्षा करत असल्याचे पाहून यमुना खूप दुःखी झाली आणि रडू लागली. यमुनेच्या सतत रडण्याने तिच्या अश्रूंचा प्रवाह तीव्र झाला आणि तिचे रूपांतर एका नदीत झाले, जी नंतर यमुना नदी म्हणून ओळखली जाऊ लागली.

### यमुना नदीचा भगवान कृष्णाशी खोल संबंध

भगवान कृष्णाच्या दिव्य खेळादरम्यान यमुना नदीला विशेष महत्त्व आहे. जेव्हा कृष्णाचे वडील वासुदेव नवजात कृष्णाला सुरक्षित ठिकाणी नेण्यासाठी यमुना नदी ओलांडत होते, तेव्हा त्यांनी यमुनाला मार्ग सोडण्यास सांगितले, परंतु यमुना नकार देत राहिली आणि वर येत राहिली. शेवटी भगवान कृष्णाने तिचे पाय धुतल्यानंतर, यमुना दोन प्रवाहात विभागली गेली, ज्यामुळे वासुदेवांना मार्ग मिळाला. यमुनेने पहिल्यांदाच कृष्णाला पाहिले. त्यानंतर भगवान कृष्णाने तीरावर आणि यमुनेत अनेक दिव्य कृत्ये केली आणि नंतर कृष्ण आणि यमुना विवाहबद्ध झाले. असे मानले जाते की यमुना नदी एकेकाळी खूप संतप्त होती, परंतु कृष्णाच्या पायांनी तिला स्पर्श केल्यानंतर ती पूर्णपणे शांत झाली आणि आजही यमुना शांत नदी म्हणून ओळखली जाते. एका धार्मिक श्रद्धेनुसार कृष्णाच्या बालपणात, पाच डोके असलेला सर्प कालियामुळे यमुना नदी विषारी होती, जो मानवांना तिचे पाणी पिऊ इच्छित नव्हता. कृष्णाने कालिया जाळल्यानंतर, यमुनेचे पाणी स्वच्छ झाले आणि लोक ते पिऊ लागले.

### यमुना नदीतील गरम पाण्याचे तळे

यमुना नदीचे उगमस्थान असलेल्या यमुनोत्री येथे गरम पाण्याचे तळे आहे. या तळ्याला सूर्यकुंड असेही म्हणतात. असे मानले जाते की हे तळे सूर्यदेव आणि त्यांच्या मुलांना समर्पित आहे. सूर्यकुंडातील पाणी इतके गरम आहे की लोक त्यात चहा आणि भात सहजपणे बनवू शकतात. सूर्यकुंडातील पाण्याचे तापमान सुमारे ८८ अंश सेल्सिअस असल्याचा अंदाज आहे. सूर्यकुंडात तयार केलेले तांदूळ आणि बटाटे यमुनोत्री मंदिरात देवतेला अर्पण केले जातात.

# यंदा भाऊबीजेचा शुभ मुहूर्त कोणता? वाचा लाडक्या भाऊरायाला ओवाळण्याची शुभ वेळ आणि परंपरा



हिंदू धर्मशास्त्रानुसार, आनंदाचा आणि उत्साहाचा असा दिवाळीचा सण सध्या मोठ्या उत्साहात सुरु आहे. दिवाळीत भाऊ-बहिणींना विशेष आकर्षण असतं ते भाऊबीजेचं. दिवाळीची समाप्तीच भाऊबीजेने होते. भाऊबीजेचा सण दरवर्षी कार्तिक महिन्यातील शुक्ल पक्षातील दुसऱ्या दिवशी साजरा केला जातो. बहीण-भावाच्या अतूट नात्याचा हा सण देशभरात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.

भाऊबीज कधी आहे?

कार्तिक महिन्यातील शुक्ल पक्षातील द्वितीया तिथीला २३ नोव्हेंबर रोजी रात्री ८ वाजून १६ वाजता सुरु होईल. तर, २३ ऑक्टोबर रोजी रात्री १० वाजून ४६ मिनिटांनी हा मुहूर्त संपेल. त्यामुळे यंदा २३ ऑक्टोबर रोजी भाऊबीजेचा सण साजरा केला जाणार आहे. त्यामुळे भाऊरायाला ओवाळण्यासाठी पूजेची सर्वोत्तम वेळ ही दुपारी १ वाजून १३ मिनिटं ते दुपारी ३ वाजून २८ मिनिटांपर्यंत असेल.

भाऊबीजेचे महत्त्व

भाऊबीज हा सण हिंदू सणांमधील महत्त्वाचा सण मानला जातो. या सणाचे महत्त्व भाऊ आणि बहिणींमधील आदर आणि प्रेम व्यक्त करणे आहे. भाऊबीजेला धार्मिक महत्त्व प्राप्त झाले आहे. शास्त्रानुसार कार्तिक महिन्यातील शुक्ल पक्षातील द्वितीया तिथीला साजरी केली जाते. या दिवशी यम आपल्या बहिणीच्या घरी गेला होता. त्यावेळी बहिणीने दाखविलेल्या आदराने प्रसन्न होऊन त्यांनी ऊ-बहिणी या दिवशी यमुनेत स्नान करून यमाची पूजा करतील असे वरदान दिले. मृत्यूनंतर त्याला यमलोकात जावे लागणार नाही. याबद्दल अशी देखील मान्यता आहे की, नरकासुराचा वध करुन भगवान श्रीकृष्ण द्वारकेत परतले होते. यावेळी त्यांची बहीण सुभद्रा हिने त्यांचं फुले, मिठाई आणि दिवे लावून स्वागत केले होते. कपाळावर टिळा लावून दीर्घायुष्य प्राप्त होण्याची प्रार्थना केली होती.

पूजेची परंपरा

भाऊबीजेच्या दिवशी बहीण सकाळी आंघोळ करून कुलदैवत, भगवान विष्णू किंवा श्री गणेशाची पूजा करते. या दिवशी बहीण भावाच्या हाताला कुंकू आणि तांदळाचा लेप लावते, आणि त्यावर पाच विड्याची पाने, सुपारी आणि चांदीचे नाणे ठेवते. नंतर भावाच्या हातावर धांगा बांधून पाणी शिंपडत भावाच्या दीर्घायुष्यासाठी मंत्राचा उच्चार करते. काही ठिकाणी, बहीण आपल्या भावाच्या कपाळावर टिळा लावत त्याला औक्षण करते, आणि भावाच्या मनगटावर धागा बांधते. मग ती तिच्या भावाला मिठाई भरवते. आणि दोघे एकमेकांना भेटवस्तू देतात. भाऊबीजेला भावाचे औक्षण करण्यासाठी तयार करण्यात येणाऱ्या ताटामध्ये कुंकू, फुले, अक्षता, सुपारी, विड्याची पाने, चांदीचे नाणे, नारळ, फुलांच्या माळा, मिठाई, धागा, केळी असावी. या सर्व गोष्टींशिवाय भाऊबीज हा सण अपूर्ण मानला जातो.

# पायांच्या तळव्यावर साचलेली डेड स्किन स्वच्छ करायचीय हे घरगुती स्क्रब तुमच्यासाठीच...

हिवाळ्यात त्वचेचा कोरडेपणा खूप वाढतो, त्यामुळे त्वचेशी संबंधित समस्या खूप त्रासदायक ठरतात. हिवाळ्यात अनेकजण चेहरा आणि हातांची काळजी घेतात. पण, पायांकडे मात्र दुर्लक्ष करतात. त्यामुळे पाय घाण आणि बॅक्टेरियाच्या संपर्कात येतात. विशेषत: हिवाळ्यात पायांच्या तळव्यांना आणि टाचांवर मृत त्वचा (डेड स्किन) साचल्याने अनेक समस्या निर्माण होतात. अशा वेळी पाय स्वच्छ आणि सॉफ्ट करण्यासाठी पार्लरमध्ये जाऊन खूप पैसे खर्च करण्याची गरज नाही. खरंतर, पायांवर जमा झालेल्या मृत त्वचेच्या पेशी घरी सहजपणे काढल्या जाऊ शकतात. यासाठी नेमके कोणते उपाय आहेत ते जाणून घेऊयात.

मृत त्वचेचा थर साचल्यामुळे, पायांचे तळवे आणि टाचांची त्वचा हिवाळ्यात खूप कडक होते. घरगुती स्क्रब आणि काही घरगुती उपायांच्या मदतीने मृत त्वचा तर स्वच्छ होईलच पण तुमच्या पायाची त्वचाही मऊ होईल.

साखर आणि लिंबाचा स्क्रब

लिंबू व्हिटॅमिन सी आणि ॲसिडिक गुणधर्मांनी समृद्ध आहे. लिंबू केवळ त्वचा स्वच्छ करण्यासाठीच नाही तर त्वचेवरील रंग सुधारण्यासाठी देखील उपयुक्त आहे. स्क्रब बनवण्यासाठी लिंबाच्या रसामध्ये साखर मिक्स करा आणि पायाच्या तळव्यांवर लावून मसाज करा. पण, त्याआधी तुमचे पाय कोमट पाण्यात सुमारे १५ ते २० मिनिटं ठेवा आणि नंतर टॉवेलने पुसून स्क्रब करा.

सैंधव मिठाने स्क्रब तयार करा

पायाच्या तळव्यांवरील मृत त्वचा काढून टाकण्यासाठी आणि टाचांच्या भेगा दूर करण्यासाठी, ऑलिव्ह ऑईल आणि आवश्यक तेलाचे काही थेंब रॉक सॉल्टमध्ये घाला आणि चांगले मिक्स करा. एकदा ग्राइंडरमध्ये बारीक करा किंवा काही काळ बाजूला ठेवा, जेणेकरून जाड मीठ विरघळू लागेल. हा स्क्रब तुम्ही शरीरावरही लावू शकता. गोलाकार हालचालीत हळूवारपणे पायांवर स्क्रब करा आणि कोमट पाण्याने त्वचा स्वच्छ करा.

बेकिंग सोड्याने मृत त्वचा स्वच्छ होईल

मृत त्वचेमुळे पाय फार कडक होतात. अशा वेळी कोमट पाण्यात एक ते दीड चमचा बेकिंग सोडा मिक्स करा आणि त्यात पाय सुमारे २० ते ३० मिनिटे ठेवा. यानंतर, प्युमिस स्टोन किंवा मऊ ब्रशच्या मदतीने मृत त्वचा स्वच्छ करा. यानंतर, टॉवेलने पाय नीट पुसून घ्या आणि मॉइश्चरायझर लावा.

## जरूर खा या भाज्या, रहाल निरोगी आणि फिट

मुंबई: ऑक्टोबर महिन्यात थंडीची सुरुवात होत असल्याने (मान्सून ते हिवाळा संक्रमण), या काळात रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी आणि पचन सुधारण्यासाठी हंगामी भाज्या खाणे अत्यंत महत्त्वाचे असते. ऑक्टोबर महिन्यात खालील ६ भाज्या खाणे आरोग्यासाठी फायदेशीर ठरते आणि तुम्हाला थंडीच्या दिवसांसाठी तंदुरुस्त ठेवते: गाजर (उर्रीीं) गाजर ही ऑक्टोबरमध्ये बाजारात येणारी एक गोड आणि जीवनसत्त्वे (तळींराळपी) समृद्ध असणारी भाजी आहे. पोषक घटक: हे व्हिटॅमिन ए (तळींराळप -), व्हिटॅमिन के (तळींराळप



घ) आणि अँटीऑक्सिडंट्सचा (-पींळेळवरपीीं) उत्कृष्ट स्रोत आहे, विशेषतः बीटा-कॅरोटीन (इशींर-उर्रीशपश). आरोग्य फायदे: डोळ्यांचे आरोग्य: व्हिटॅमिन मएफ मुळे दृष्टी सुधारण्यास मदत होते. त्वचा आणि प्रतिकारशक्ती: हे त्वचेला निरोगी ठेवते आणि शरीराची रोगप्रतिकारशक्ती वाढवते. खाण्याची पद्धत: सूप, सलाड, पोहे किंवा पराठ्यामध्ये किसून वापरू शकता. पत्ताकोबी (उरललरसश) पत्ताकोबी या महिन्यात भरपूर उपलब्ध होते आणि ती पचनासाठी खूप चांगली मानली जाते. पोषक घटक: यामध्ये व्हिटॅमिन सी (तळींराळप उ) आणि व्हिटॅमिन के (तळींराळप घ) तसेच फायबर (ऋळलशी) चांगले असते. आरोग्य फायदे: पचन सुधारते: फायबरमुळे पचनक्रिया सुरळीत राहते आणि बद्धकोष्ठता (उपीींळ-रिींळेप) टाळण्यास मदत होते. हाडे मजबूत: व्हिटॅमिन मकेफ मुळे हाडे मजबूत होतात. डिटॉक्सिफिकेशन: ही शरीरातील विषारी पदार्थ बाहेर काढण्यास **(क्रमशः पुढील अंकात)**...

## तोंड येण्याची समस्या का होते? कारणे आणि घरगुती उपाय



मुंबई : तोंड येणे म्हणजे तोंडात किंवा जिभेवर येणारे छोटेसे पण वेदनादायक फोड. ही एक सामान्य समस्या असली, तरी वारंवार होऊ लागल्यास त्याकडे दुर्लक्ष करता कामा नये. गरम पेये जसे की चहा किंवा कॉफी पिताना तोंड भाजणे, दात घासताना जिभेवर चुकून लागणे या कारणांनी तोंडात जखमा होऊ शकतात. पण जर कोणतीही बाह्य दुखापत न होता तोंड वारंवार येत असेल, तर हे आरोग्याच्या इतर समस्यांचे संकेत असू शकते.

जाणून घ्या तोंड येण्यामागील कारणे आणि त्यावरचे घरगुती उपाय:

तोंड येण्यामागची प्रमुख कारणे

रोगप्रतिकारक शक्ती कमी होणे शरीराची प्रतिकारशक्ती कमी झाल्यास संक्रमण होण्याची शक्यता वाढते. यामुळे तोंड येण्याचे प्रमाण वाढू शकते.

हार्मोन्समधील चढ-उतार महिलांमध्ये मासिक पाळी दरम्यान हार्मोनल बदल होतात. त्यामुळे या काळात तोंड येण्याची समस्या जाणवते.

व्हिटॅमिन्सची कमतरता व्हिटॅमिन इ१२, आयर्न आणि फॉलिक ॲसिडच्या कमतरतेमुळे तोंडात वारंवार फोड येतात.

पचनतंत्रातील बिघाड अपचन, बद्धकोष्ठता किंवा आंतड्यांचे विकार असलेल्या व्यक्तींमध्ये तोंड येण्याची समस्या अधिक दिसून येते.

संसर्ग आणि ॲलर्जी दूषित पाणी पिणे, बॅक्टेरिया किंवा व्हायरल संसर्ग, तसेच काही ॲलर्जीक पदार्थ खाल्ल्यामुळेही तोंडात फोड येऊ शकतात.

धूम्रपान आणि तंबाखू सेवन तंबाखूजन्य पदार्थांचा वापर तोंडाच्या आरोग्यावर विपरीत परिणाम करतो. धूम्रपानामुळे तोंड येणे आणि कधीकधी अल्सर होण्याची शक्यता असते.

तोंड येण्यावर घरगुती आणि नैसर्गिक उपाय

कोरफडीचा उपयोग कोरफड (ॲलोवेरा) मध्ये थंडावा देणारे गुणधर्म असतात. कोरफडीचा रस प्यायल्याने तोंडातले फोड लवकर बरे होतात.

लिकोरिस पावडर आणि मध गुळवेल किंवा लिकोरिस पावडर मधात मिसळून घेणे तोंडाच्या अल्सरसाठी प्रभावी ठरते.

पुरेसे पाणी पिणे शरीरातील उष्णता कमी ठेवण्यासाठी दिवसभरात भरपूर पाणी प्या. हायड्रेटेड राहिल्यामुळे तोंड येण्याचे प्रमाण कमी होते.हळद पाण्याने गुळण्या कोमट पाण्यात टाकून गुळण्या केल्याने तोंडातील सूज आणि वेदना कमी होतात. हळदीचे अँटीसेप्टिक गुण फायदेशीर ठरतात.

तोंड येणे ही एक साधी वाटणारी पण त्रासदायक समस्या असू शकते. ही समस्या वारंवार होत असल्यास, ती केवळ घरगुती उपायांवर सोडवण्याऐवजी डॉक्टरांचा सल्ला घेणे अधिक योग्य ठरेल. योग्य आहार, पचनसंस्थेची काळजी आणि स्वच्छता पाळल्यास या समस्येपासून दूर राहता येईल.





## हे ६ पदार्थ देतात दुधा-पेक्षा जास्त कॅल्शियम!

**(मागील अंकावरुन..)**

१) दही-दुधाच्या तुलनेत दह्यात अधिक कॅल्शियम असतो. एक कप साध्या दह्यात सुमारे ४८८ मिलीग्राम कॅल्शियम असतो. यामध्ये प्रोबायोटिक्स आणि प्रथिनांचाही चांगला स्रोत आहे. फळं घालून तुम्ही हे अधिक पौष्टिक बनवू शकता.

**२) फोर्टिफाइड संत्र्याचा रस**

संत्र्याच्या रसामध्ये नैसर्गिकरित्या कॅल्शियम नसतो, पण फोर्टिफिकेशनमुळे एक कप रसात ३४७ मिलीग्राम कॅल्शियम असतो. दूध न पिता रस प्यायचा पर्याय निवडणाऱ्यांसाठी हा एक चांगला पर्याय ठरतो.

३) ओट मिल्क (जरीं चळश्रज्ञ)

वनस्पती-आधारित दुधांमध्ये ओट मिल्क लोकप्रिय आहे. एक कप ओट दुधात ३५० मिलीग्राम कॅल्शियम असतो. यामध्ये प्रथिनं कमी असली तरी कॅल्शियम फोर्टिफिकेशनमुळे हे दूध उपयुक्त ठरतं.

४) सॅल्मन मासा (डरश्रोप ऋळीह)

फॅटी फिश म्हणजे सॅल्मन हा आरोग्यासाठी अनेक प्रकारे फायदेशीर आहे. अर्धा कप सॅल्मनमध्ये ३१२ मिलीग्राम कॅल्शियम असतो. त्यासोबतच ओमेगा-३ फॅट्स आणि अनेक जीवनसत्त्वंही मिळतात.

५) बदाम दूध

---

## आता याला जबाबदार कोण?

वृत्तपत्र

सध्याच्या परिस्थितीत बेस्ट उपक्रम हा व्हेंटिलेटरवर आहे. या बेस्ट उपक्रमात कार्यरत आणि सेवानिवृत्त मराठी सेवक वर्गाचे लचके तोडण्याचे कार्य गेली ३० ते ३५ वर्षे सातत्याने मुंबई महानगरपालिकेत सत्तेत असणारे नियोजनशून्य शिवसेना उबाठाची बेस्ट समिती सर्वस्वी जबाबदार आहे आणि याचाच राग बेस्टच्या कर्मचारी अधिकाऱ्यांनी बेस्टच्या पतपेढीच्या निवडणुकीत काढला. या निवडणुकीत समर्थ कामगार संघटनेचे संस्थापक नेते खासदार नारायण राणे यांच्या सूचनेनुसार बेस्ट पतपेढी निवडणुकीत समर्थ बेस्ट कामगार संघटनेच्या अथक प्रयत्नाने आमदार प्रसाद लाड यांनी घेतलेल्या पुढाकाराने बनवलेल्या सहकार समृद्धी पॅनल आणि शशांकराव पॅनलच्या सहकाऱ्यांनी २१-० असा पराभव करून ठाकरे ब्रँडचा बँड वाजवला व शिवसेना उबाठाच्या बेस्ट कामगार सेनेला बेस्ट उपक्रमाच्या बेस्ट पतपेढीतून बाहेरचा रस्ता दाखवला. बेस्ट पतपेढी निवडणुकीच्या प्रचारात समर्थ कामगार संघटनेचे सरचिटणीस विलास पवार यांनी विशेष मेहनत घेतली होती.

सन २०१९ ला अस्तित्वात असणाऱ्या शिवसेना (उबाठा)च्या बेस्ट समितीने बेस्ट उपक्रमाच्या अखत्यारित अस-लेली बसआगारे, बसस्थानके पुनर्विकास करण्याच्या नावाखाली विकासकांना देऊन त्यातून बेस्ट उपक्रमाला उत्पन्न देणारी रक्कम अजूनही बेस्ट उपक्रमाच्या तिजोरीत आलेली नाही, थकबाकीच आहे, याबाबत प्रशासन आणि तात्कालीक बेस्ट समिती उत्तर देणार की नाही, तसेच बेस्टच्या विद्युत पुरवठा विभागाच्या मोठ्या, लहान वीज ग्राहकांची थकबाकी लाख, करोडच्या रकमेत आहे ती ही वसूल करताना बेस्ट उपक्रमाच्या नाकी नऊ येत आहेत. वरील थकबाकी जर वेळेवर वसूल झाली असती तर बेस्ट उपक्रम आर्थिक व्हेंटिलेटरवर गेला नसता आणि सेवकवर्गाची थकीत देणीही थोड्या प्रमाणात वेळेवर प्रदान करण्यात आली असती, ही वस्तुस्थिती आहे याला नियोजनशून्य उबाठाची बेस्ट समिती आणि प्रशासनातले झारितले शुक्राचार्य सर्वस्वी जबाबदार आहेत.

सद्यस्थितीत बेस्ट उपक्रमातील सेवकवर्गाला मिळणाऱ्या सानुग्रह अनुदानाच्या (बोनस) प्रश्नावर शिवसेना उबाठा यांच्या प्रतिनिधिक कामगार संघटनेने राजकारण करत सेवकवर्गाला वेठीस धरत आगारा-आगाराबाहेर निदर्शने करण्याची योजना आखली होती; परंतु महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,अजित पवार, समर्थ बेस्ट कामगार संघटनेचे अध्यक्ष मंत्री नितेश राणे, मंत्री आशीष शेलार आणि आमदार प्रसाद लाड, तसेच मुंबई महापालिका आयुक्त भूषण



गगराणी आणि बेस्ट उपक्रमाच्या महाव्यवस्थापक सोनिया सेठी या मान्यवरांच्या पुढाकाराने दि.१६ ऑक्टोबर रोजी मुंबई महानगरपालिकेला आणि बेस्ट उपक्रमाला रुपये ३१ हजार-इतके सानुग्रह अनुदान (बोनस) जाहीर करण्यात आले, त्यामुळे शिवसेना उबाठाच्या कामगार संघटनेचा फियास्को झाला. खोटं बोल पण रेटून बोल या शिवसेना उबाठाच्या प्रवृतीला महायुतीने चपराक दिली आणि बोनस देण्याचा कामगार हिताचा निर्णय घेऊन बेस्टच्या सेवकवर्गाच्या आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या दिवाळी सणाचा आनंद द्विगुणित करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे बेस्टच्या २५ ते ३० हजार सेवक वर्गाच्या घरची दिवाळी आनंदात साजरी होणार आहे.

बेस्ट उपक्रमाच्या सेवकवर्गाकडून यासाठी मनःपूर्वक आभार आणि धन्यवाद. देण्यात आले. मात्र यातही पालिकेने बेस्टला सानूग्रह अनुदान देताना वेगळी रक्कम न देता जी आर्थिक मदत दर वर्षासाठी करण्यात येते त्यातून कापून घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे; परंतु असं सध्या तरी कर्मचाऱ्यांच्या घरची दिवाळी गोड होणे महत्त्वाचे. वर्षानुवर्षे मुंबई महानगरपालिकेवर सत्ता भोगलेल्या उबाठा शिवसेनेने मुंबईत मराठी माणूस टिकावा यासाठी नेमके केले तरी काय? आज खरा मुंबईकर हा मुंबईच्या बाहेर फेकला गेला मात्र तेच अनधिकृतरीत्या झोपडपट्ट्या बांधून राहिलेले उपरे मात्र शासनाच्या निरनिराळ्या योजनेमुळे खरे मुंबईकर झाले. मात्र खरा मुंबईकर मुंबई बाहेर गेल्यामुळे शिवसेनेची खरी वोट बँक मुंबई बाहेरून मुंबईत प्रवास करून कामावर येऊ लागली. याचा थोडाफार फटका हा शिवसेनेला बसणारच होता. मात्र त्यावेळेस हा मुंबईकर मुंबई बाहेर जाऊ नये म्हणून शिवसेनेतर्फे पद्धतशीरपणे कोणतेही प्रयत्न केले गेले नाही. आज मुंबई महानगरपालिका बेस्ट यासारख्या संस्थांमध्ये काम करणारा कर्मचारी वर्ग हा रोज दोन ते अडीच तास लोकलमध्ये लटकून प्रवास करून मुंबईत येत आहे, मात्र दुसरीकडे मुंबई महानगरपालिकेच्या अखंड भूखंडांवर अनधिकृत अतिक्रमणे उभी राहिली. त्याचं जर का मुंबई महानगरपालिकेच्या वसाहती उभारल्या गेल्या असत्या तर आज शिवसेनेची अखंड वोट बँक उभी राहिली असती तर दुसरीकडे बेस्टच्या सध्या मोठमोठ्या वसाहती आहेत, त्यांचे जर पद्धतशीरपणे नियोजन करून त्यांचा पुनर्विकास केला गेला असता तर आज जो ७० टक्के कर्मचारी वर्ग हा मुंबई बाहेरून वेस्ट मध्ये कामाला येत आहे तो आज मुंबईत राहून त्याने नोकरीवर कर्तव्यपूर्तता केली असती. दोन आठवड्यापूर्वी बेस्टबद्दल जो कळवळा उबाठा पक्षास आला होता तो जर त्या वेळेला असता तर आज ऊबाठा पक्षाची ही चिंताजनक अवस्था झाली नसती. त्यामुळे बेस्टच्या या सर्वस्वी अवस्थेला नेमके जबाबदार कोण आहे हे सर्वसामान्य कर्मचारी तसेच मुंबईकरांनाही ठाऊक आहे.

---

**शिंकताना किंवा खोकताना लघवी होत असेल तर असू शकतो हा आजार...**



## डॉक्टर टीप्स

### हेल्थ टिप्स



अत्यधिक कॉफीचे सेवन केल्यास.

धूम्रपानाची सवय असल्यास.

उपचार-हा आजार दीर्घकाळापासून असल्यास वैद्यकीय सल्ला घेणे नितांत आवश्यक आहे. मूत्राशयाच्या व्यायामांपासून ते ऑपरेशनपर्यंतचे पर्याय उप-लब्ध आहे.डॉक्टर रुग्णाला जीवनशैलीत सुधारण्याचा सल्ला देतात. धूम्रपान न करणे आणि जास्त कॉफी न पिण्याचा सल्ला दिला जातो.

स्नायूंना बळकट करण्यासाठी व्यायाम शिकवले जातात. यांना पेल्विक फ्लोर स्नायूंचे प्रशिक्षण व्यायाम असे म्हणतात.मूत्राशयाचे प्रशिक्षण दिले जाते. ह्यात जास्त जोरात लघवी आल्यास काय करणे. तसेच प्रशिक्षण देऊन लघवी कशी थांबवून ठेवू शकतो शिकवणी दिली जाते.

**(क्रमशः)**





## विनोद

**मोहन : काळ्या पेनने 'तांबडे' लिहून दाखव.**

**अनिल : अशक्य आहे. मोहनने आ-पले काळे पेन काढून !'तांबडे' असा शब्द लिहिला.**

## संदेश

Santa: mera beta meri baat sunta hi nahi hai

Banta: kyu? itna gamandi hai kya?

Santa: nahi. woh behara hai.

## सुविचार

**माझ्या शब्दकोशातून 'अशक्य' या शब्दास मी काढून टाकलेले आहे.**
**- नेपोलियन**

### संस्कृत सुभाषित

**अनिर्वेदेन दीर्घेण निश्चयेन ध्रुवेण च**
**देवदेवप्रसादाच्च क्षिप्रं फलम्वाप्यते ॥**
**(शांतीपर्व, अध्याय १५३, ेक ११७, महाभारत)**

अर्थ - दीर्घोद्योगाने, दृढनिश्चयाने व ईश्वरी कृपेने सत्वर कार्यसिद्धी होते.



---

## मनोरंजक महाशब्दकोडे

कोड क्र.२९



### आडवे शब्द

१. आराम करण्याचे सणवार? (वाक्प्रचार)
१०. छोटे कुबड
१२. पुरुष
१३. निवासस्थान
१४. रमापती
१५. जेमतेम, मोठ्या मुष्किलीने
१७. एक पालेभाजी
१९. कामावर बहिष्कार
२०. आंब्याचे रोप
२२. भीती, वचक
२३. अकस्मात, पूर्वकल्पना नसताना
२४. शिऱ्यातील प्रमुख पदार्थ
२५. निपचिप
२७. नशीब, काम
२८. फजिती, टवाळी
३०. प्रयत्न
३१. रममाण, निमग्न
३२. काम टाळणारा
३४. रेशमी धोतर
३७. घाण पाणी
४०. विनंती
४२. गर्व, ताठा
४३. रोगप्रतिबंधक द्रव
४५. गारा
४६. वानवा, उणीव
४८. घराची सजावट
५०. विद्यार्थ्यांचे राहण्याची जागा
५२. वैताग, नाकी आणलेला दम!
५४. पंख
५६. खून, वध
५८. बोलविणे
५९. अपवित्र
६२. सहाय्य
६४. सूर्याचा मंत्र
६५. परिस्थितीला अचानक मिळालेले वळण
६६. छाटणे
६७. आश्चर्य
६८. कर भरण्याची योग्यता
७०. दुर्लक्ष, हेळसांड
७२. चिक्कू माणूस
७३. नवीन
७४. लोकांचे राज्य
७६. साईबाबांची उक्ती
७९. मोठे गाव
८०. अवलोकन
८१. नजरफेक

### उभे शब्द

१. सूर्य
२. उत्तराधिकार
३. प्रत्येक वर्ष
४. श्रीरामाचे एक नाव
५. पराभव
६. पचनास सहाय्य करणार पदार्थ
७. गुन्हा
८. पूर्ण भरतीचे वेळ
९. उद्धट, अरेरावी करणारा मनुष्य
११. गुरांचा जमाव
१६. निरर्थक बडबड
१७. गडीमाणसे
१८. वरपांगी
१९. संभाव्य धोका
२१. हिंदीतील आढेवेढे
२२. दोरा
२४. कांती, तेज
२६. ऱ्हास
२९. जीभ
३०. पंतप्रधान
३३. कावळ्याचे ओरडणे
३५. करुणा, कीव
३६. भांडण
३८. वर्तमानपत्रातील कप्पा
३९. सभेची जागा
४१. रानभूल
४४. जळाऊ लाकूड
४६. पुष्कळ
४७. वाहून नेणे
४८. कायदा-सुव्यवस्थेला जबाबदार मंत्री
४९. खंदक
५१. मनाला टोचणारे दुःख
५३. श्रेष्ठ-कनिष्ठ असा भेदाभेद
५५. अलमारी
५७. मीठ (हिंदी)
५८. जमाखर्च
५९. गटार
६०. भरपूर मार देणे, चोपणे (वाक्प्रचार)
६१. 'गपापा' होणारा ऐवज!
६३. तुकडी, पाकळी
६५. कोलकाताचे जुने नाव
६७. डोळे,६९. संकटातून पार करणारा
७०. निराश
७१. मोठा आवाज
७३. अपऱ्या नाकाचा
७५. पडसे,७६. च्या बरोबर
७७. प्रेम की पैसा?
७८. पहिला आकडा

### आडवे उत्तर

१.दिवाळी दसरा हातपाय पसरा १०.पोक १२.नर १३.घर १४.रमावर १५.कसाबसा १७.चाकवत १९.संप २०.कलम २२.धाक २३.अचानक २४.रवा २५.गपगार २७.कर्म ३०.प्रयास ३१.रत ३२.चुकार ३४.कद ३७.नरकवणी ४०.याचना ४२.नक्षा ४३.लस ४५.कारका ४६.अभाव ४८.गृहरचना ५०.वसतिगृह ५२.वात ५४.पर ५६.हनन ५८.आमंत्रण ५९.नापाक ६२.मदत ६४.गायत्री ६५.कलाटणी ६६.कलम ६७.नवल ६८.करपात्रता ७०.हयगय ७२.कद्रू ७३.नव ७४.जनसत्ता ७६.सबका मालिक एक ७९.शहर ८०.पाहणे ८१.कटाक्ष

### उभे उत्तर

१.दिनकर २.वारसा ३.दरसाल ४.राघव ५.हार ६.पाचक ७.परत ८.समा ९.रावणाचा लेक ११.कळप १६.बकवास १७.चाकरचुकर १८.वरकरणी १९.संकट २१.मगर २२.धागा २४.रया २६.पतन २९.रसना ३०.प्रधानमंत्री ३३.कावकाव ३५.दया ३६.कलह ३८.रकाना ३९.सभागृह ४१.चकवा ४४.सरपण ४६.अति ४७.वहन ४८.गृहमंत्री ४९.चर ५१.सल ५३.तरतमभाव ५५.कपाट ५७.नमक ५८.आयव्यय ५९.नाला ६०.कणीक तिंबणे ६१.हपापाचा माल ६३.दल ६५.कलकत्ता ६७.नयन ६९.तारक ७०.हताश ७१.गजर ७३.नकटा ७५.सर्दी ७६.सह ७७.माया ७८.एक



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### टीम इंडियासाठी महिला विश्वचषकात 'करो या मरो'ची परिस्थिती

मुंबई,-आयसीसी महिला क्रिकेट विश्वचषक २०२५ चं सहऱ्यजमानपद भूषवणाऱ्या टीम इंडियासाठी आत 'करो या मरो'ची परिस्थिती निर्माण झालीय. सलग तीन पराभव झाल्यानंतर हरमनप्रीतच्या टीम इंडियाला उपांत्य फेरीत पोहोचण्यासाठी आता उर्वरित दोन्ही सामन्यांत मोठ्या फरकाने विजय मिळवावा लागणार आहे.



टीम इंडियाला गरज मोठ्या विजयाची : उपांत्य फेरीत सध्या दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडने आपली जागा पक्की केलीय. तर चौथ्या जागेसाठी भारतासह, न्यूझीलंड आणि श्रीलंकाही प्रयत्नशील आहे. पाकिस्तान आणि बांगलादेश उपांत्य फेरीच्या स्पर्धेतून पडले आहेत. साखळी फेरीत श्रीलंकेने बांगलादेशला हरवताच, बांगलादेशला टॉप-फोरमध्ये स्थान मिळवणं अशक्य झालेय. सहऱ्यजमान श्रीलंकेची टॉप-फोरमध्ये स्थान मिळवण्याची शक्यता फारच धुसर आहे. कारण अखेरच्या सामन्यात त्यांनी आव्हान संपलेल्या पाकिस्तानल हरवले. तरी ते सहा गुणांपर्यंतच मजल मारू शकतील. मात्र भारत आणि न्यूझीलंडकडे उर्वरित दोन्ही सामने जिंकून आठ गुणांसह उपांत्य फेरी गाठण्याची संधी आहे. विश्वचषकात अद्याप एकही विजय न मिळवलेल्या पाकिस्तानला दक्षिण आफ्रिकेनं पराभूत करत रिटर्नचे तिकीट हातात दिलेय.

***

### पाकिस्तानच्या ३८ वर्षीय गोलंदाजाने घडवला इतिहास, १४८ वर्षांच्या कसोटीत....

दिल्ली-पाकिस्तान आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात पाकिस्तानमध्ये कसोटी मालिका खेळवली जात आहे. या कसोटी मालिकेतील पहिल्या सामन्यात पाकिस्तानने कसोटी वर्ल्ड चॅम्पियन दक्षिण आफ्रिकेला पराभवाचा धक्का दिला. आता दुसरा कसोटी सामना सुरू असून यामध्ये पाकिस्तानच्या ३८वर्षीय खेळाडूला पदार्पणाची संधी मिळाली आणि त्याने पहिल्याच सामन्यात ५ विकेट्स घेत दणका उडवला.पाकिस्तानकडून कसोटी पदार्पण करणारा दुसरा सर्वात वयस्कर क्रिकेटपटू आसिफ आफ्रिदीने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्याच डावात उत्कृष्ट कामगिरी केली. ३८ वर्षीय डावखुऱ्या फिरकी गोलंदाजाने बुधवारी (२२ ऑक्टोबर) पाच विकेट्स घेत पाहुण्या संघाच्या फलंदाजीला सुरूंग लावला. आसिफच्या शानदार गोलंदाजीमुळे पाकिस्तानच्या पहिल्या डावातील ३३३ धावांच्या प्रत्युत्तरात दक्षिण आफ्रिकेने २३५ षटकांत आठ विकेट्स गमावल्या.आसिफ आफ्रिदीने ५५ धावा करणाऱ्या टोनी डी जॉर्जीचा पहिला बळी घेतला. त्यानंतर त्याने डेवाल्ड ब्रेव्हिसला बाद केलं, जो खातंही उघडू शकला नाही. त्यानंतर त्याने काइल व्हेरेनला १० धावांवर बाद केलं.



**

### रोहित-विराटच्या फलंदाजीबाबत बॅटिंग कोचचे मोठे वक्तव्य...

दिल्ली-ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी रोहित शर्मा आणि विराट कोहली यांनी क्रिकेटच्या मैदानावर पुनरागमन केलं. रोहित-विराट पर्थमधील पहिल्या वनडे सामन्यात फेल झाले. यानंतर रोहित-विराटला सध्या ट्रोल केलं जात आहे. रोहित-विराटच्या फॉर्मची आणि फलंदाजीची सर्वत्र चर्चा सुरू असताना भारताचे फलंदाजी कोच सितांशु कोटक यांनी वक्तव्य केलं आहे.माजी भारतीय कर्णधार रोहित शर्मा आणि विराट कोहली यांची आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पुनरागमनानंतरची सुरुवात फारशी चांगली राहिली नाही. तब्बल सात महिन्यांच्या विश्रांतीनंतर दोघेही राष्ट्रीय संघात परतले, मात्र त्यांची बॅट शांत होती. जोश हॅजलवूडच्या उसळत्या चेंडूवर रोहित दुसऱ्या स्लिपमध्ये झेलबाद झाला, तर मिचेल स्टार्कविरुद्ध कोहलीने पॉईंटवर सोपा झेल दिला. निराशाजनक कामगिरीनंतर प्रशिक्षक सितांशु कोटक यांनी सांगितलं की, भारताच्या फलंदाजीवर हवामानाचा मोठा परिणाम झाला. पावसामुळे खेळ वारंवार थांबत असल्याने फलंदाजांची लय आणि टायमिंग बिघडलं, ज्याचा परिणाम त्यांच्या फलंदाजीवर झाला.रोहित आणि कोहलीच्या खेळात थोडी गती आणि लय कमी दिसली का; यावर बोलताना सितांशु कोटक म्हणाला, ''मला तसं वाटत नाही.



## भारताविरुद्ध ऑस्ट्रेलियाने जिंकला टॉस, भारताला फलंदाजीस बोलावले

ॲडलेड : भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील दुसऱ्या वनडे सामन्यात ऑस्ट्रेलियाच्या संघाने टॉस जिंकत पहिल्यांदा गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे. तीन वनडे सामन्यांच्या मालिकेतील हा दुसरा सामना आहे. ऑस्ट्रेलियाने भारतीय संघाला पहिल्यांदा फलंदाजीस बोलावले आहे.

ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर असलेला भारतीय क्रिकेट संघ, विशेषतः ॲडलेड येथे होणाऱ्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यासाठी संघात मोठे फेरबदल करण्याची शक्यता आहे. युवा कर्णधार शुभमन गिलच्या नेतृत्वात असलेला भारतीय संघ, आगामी सामन्यात विजयाच्या इराद्याने मैदानात उतरणार आहे, ज्यामुळे अंतिम ११ मध्ये 'धुरंधर' खेळाडूच्या प्रवेशाचा मार्ग मोकळा होऊ शकतो. या सामन्यासाठी भारतीय संघात कोणतेही बदल करण्यात आलेले नाहीत. दुसरीकडे ऑस्ट्रेलियाच्या प्लेईंग ११मध्ये तीन बदल झाले आहेत. जोश फिलिप, नाथन एलस आणि मॅथ्यू कुहमैन हे सामन्यातनाहीत. त्यांच्या जागी अनुक्रमे एलेक्स कॅरी, जेवियर बार्टलेट आणि एडम झाम्पा यांना अंतिम ११मध्ये स्थान देण्यात आले आहे.दुसऱ्या वनडेत ऑस्ट्रेलियाचे प्लेईंग ११ - ट्रेविस हेड, मिचेल मार्श(कर्णधार), मॅथ्यू शॉर्ट, मॅथ्यू रेनश, एलेक्स कॅरी(विकेटकीपर), मिचेल ओवेन, कूपर कोनोली, मिचेल स्टार्क, जेवियर बार्टलेट, जोश हेझलवूड आणि एडम झाम्पा.भारताचे प्लेईंग ११ - रोहित शर्मा, शुभमन गिल(कर्णधार), विराट कोहली, श्रेयस अय्यर, अक्षर पटेल, केएल राहुल(विकेटकीपर), नितीश कुमार रेड्डी, वॉशिंग्टन सुंदर, हर्षित राणा, अर्शदीप सिंह आणि मोहम्मद सिराज.

## स्मृती मंधाना अव्वल स्थानावर



### सर्वाधिक वेळा ५० पेक्षा अधिक धावा करण्याचा विक्रम

कोलंबो : आयसीसी महिला क्रिकेट वर्ल्ड कप २०२५ स्पर्धेतील २० व्या सामन्यात भारताची उप कर्णधार आणि सलामीची फलंदाज स्मृती मानधना हिने सलग दूसरे अर्धशतक झळकावले. त्यामुळे स्मृती मंधाना फलंदाजांच्या क्रमवारीत अव्वल स्थानावर आहे. इंग्लंड विरुद्धच्या सामन्यात पुन्हा एकदा ती शतकाच्या जवळ बाद झाली. स्मृती मानधनाचे शतक अवघ्या १२ धावांनी हुकले. एवढेच नाही तर तिचा बळी पडला. अन् सामना फिरला, भारतीय संघाने हातात आलेला सामना गमावला. पण या सामन्यात ९४ चेंडूतील ८८ धावांची स्मृतीची खेळी एक नवा विक्रम प्रस्थापित करणारी ठरली. या खेळीसह स्मृती मानधना हिने महिला क्रिकेटमध्ये अधिराज्य गाजवणाऱ्या भारताची माजी कर्णधार मिताली राज हिला मागे टाकले आहे.

महिला वनडे क्रिकेटमध्ये घरच्या मैदानावर सर्वाधिक वेळा ५० पेक्षा अधिक धावा करण्याचा विक्रम आता स्मृतीच्या नावे झाला आहे. याआधी २२ वेळा अशी कामगिरी करून मिताली राज भारताकडून अबलस्थानावर होती. स्मृतीनं इंदूरच्या मैदानातील ८८ वेली धावांच्या खेळीसह २३ व्या वेळी घरच्या मैदानात फिफ्टी प्लसचा डाव साधला.महिला वनडेत घरच्या मैदानात सर्वाधिक फिफ्टी प्लस धावा करण्याचा विक्रम हा सुझी बेट्सच्या नावे आहे. तिने न्यूझीलंडच्या स्टार बॅटरनं आपल्या घरच्या मैदानात २८ वेळा फिफ्टी प्लसचा डाव साधला आहे. त्यापाठोपाठ आता स्मृती मानधनाचा नंबर लागतो. आगामी काळात स्मृती न्यूझीलंडच्या बॅटरलाही मागे टाकू शकते. पण यासाठी तिला आपल्या कामगिरीतील सातत्य कायम ठेवावे लागेल. मिताली विज राज आणि इंग्लंडची चालोंट एंडवड्र्स या दोघींनी घरच्या मैदानात प्रत्येकी २२-२२ वेळा अशी कामगिरी केल्याचा रेकॉर्ड आहे.

महिला वनडेत घरच्या मैदानात सर्वाधिक फिफ्टी प्लस धावसंख्या करणाऱ्या बॅटर्स

२८ (न्यूजीलंड) सूझी बेट्स

२३ (भारत) स्मृती मानधना

२२ (इंग्लंड) चार्लोट एडवड्र्स



### ऑलिंपिक विजेता नीरज चोप्राला भारतीय सैन्यात लेफ्टनंट कर्नलची मानद पदवी

नवी दिल्ली : ऑलिंपिक सुवर्णपदक विजेता भालाफेकपटू नीरज चोप्रा याला बुधवारी भारतीय सैन्यात लेफ्टनंट कर्नल या मानद पदाने सन्मानित करण्यात आले. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांच्या उपस्थितीत दिल्लीतील समारंभात हा गौरव सोहळा पार पडला. नीरजच्या ॲथलेटिक्समधील कामगिरीची आणि लाखो तरुणांना दिलेल्या प्रेरणेची दखल घेऊन त्याला हा सन्मान देण्यात आला.

नीरज चोप्रा आता देशासाठी सुवर्ण कामगिरी करणाऱ्या आणि सशस्त्र दलात मानद पद प्राप्त करणाऱ्या निवडक खेळाडूंच्या गटात सामील झाला आहे. या समारंभाला भारतीय लष्कर व प्रादेशिक सैन्याचे अनेक वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

नीरजने २६ ऑगस्ट २०१६ रोजी नायब सुभेदार पदावर ज्युनियर कमिशन्ड ऑफिसर म्हणून भारतीय सैन्यात प्रवेश केला होता. दोन वर्षांनंतर, त्याला ॲथलेटिक्समधील उल्लेखनीय कामगिरीसाठी अर्जुन पुरस्कार देण्यात आला. त्यानंतर २०२१ मध्ये, त्याला देशातील सर्वोच्च क्रीडा सन्मान खेलरत्न पुरस्कार मिळाला टोकियो २०२० ऑलिंपिकमध्ये सुवर्णपदक जिंकल्यानंतर नीरजला २०२२ मध्ये परम विशिष्ट सेवा पदक प्रदान करण्यात आले. त्याच वर्षी त्याला सुभेदार मेजर पदावर बढती मिळाली आणि भारत सरकारने त्याला पद्मश्री पुरस्काराने गौरवले.

२७ वर्षीय नीरज चोप्रा हा केवळ एक आंतरराष्ट्रीय विजेता नाही, तर देशातील तरुणांसाठी प्रेरणास्थान ठरला आहे. आता लष्करात मिळालेल्या मानद पदामुळे त्याच्या कार्याचा सन्मान अधिक उंचावला आहे.

## कुलदीप यादवची भारतीय संघात एंट्री होणार?

ॲडिलेड-भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेतील दुसरी मॅच उद्या ॲडिलेड येथे होणार आहे. दुसऱ्या वनडेत शुभमन गिलच्या नेतृत्त्वात भारतीय संघ मैदानात उतरेल. दुसऱ्या वनडेत भारताला मिशेल मार्शच्या ऑस्ट्रेलिया संघावर विजय मिळवावा लागेल. पहिल्या वनडेत पर्थमध्ये भारताला पराभव स्वीकारावा लागला होता. ऑस्ट्रेलियानं पहिल्या वनडेत भारतावर ७ विकेटवर विजय मिळवला. रोहित शर्मा आणि विराट कोहली हे दोघे पहिल्या वनडेत अपयशी ठरले होते. दुसऱ्या वनडेत कुलदीप यादवला संघात संधी मिळू शकते.

ॲडिलेड मॅचपूर्वी फलंदाजी प्रशिक्षक सीतांशू कोटक यांना रोहित शर्मा आणि विराट कोहली संदर्भात प्रश्न विचारण्यात आला. रोहित शर्मा आणि विराट कोहलीला मालिकेपूर्वी लयीत नव्हते? या प्रश्नाचे उत्तर देताना कोटक म्हणाले, मला असे वाटत नाही, त्या दोघांनी आयपीएल खेळले आहे. दोघांची तयारी चांगली झाली, दोघांकडे चांगला अनुभव आहे. ऑस्ट्रेलियाला येण्यापूर्वी त्यांच्याकडे तयारीला वेळ होता, त्यांनी तयारी पूर्ण केली आहे.सीतांशू कोटक यांनी पहिल्या मॅचमध्ये पावसाचा परिणाम झाला. ऑस्ट्रेलियाने पहिल्यांदा फलंदाजी केली असती तर त्यांची स्थिती



देखील तशीच झाली असती. भारताने पहिल्या वनडेमध्ये कुलदीप यादवला संधी दिली नव्हती. कुलदीप यादवने आशिया कपमध्ये चांगली कामगिरी केली होती. पहिल्या वनडेत शुभमन गिलने वॉशिंग्टन सुंदर याला संधी दिली होती. पहिल्या वनडेत भारताच्या गोलंदाजांना प्रभावी मारा करता आला नव्हता त्यामुळं दुसऱ्या वनडेत कुलदीप यादवला संधी मिळते का ते पाहावं लागेल.

भारताची संभाव्य प्लेईंग इलेव्हन

रोहित शर्मा, शुभमन गिल (कॅप्टन),विराट कोहली, श्रेयस अय्यर,अक्षर पटेल, केएल राहुल, नितीशकुमार रेड्डी, हर्षित राणा, मोहम्मद सिराज, अर्शदीप सिंग, कुलदीप यादव किंवा वॉशिंग्टन सुंदर

ऑस्ट्रेलियाची संभाव्य प्लेईंग इलेव्हन

मिशेल मार्श (कॅप्टन), ट्रेविस हेड, मार्नस लाबूशेन, जोश इंग्लिस, मिशेल ओन, एलेक्स कॅरी, कूपर कोनोली, जोश हेजलवूड, मिशेल स्टार्क, नॅथन एलिस, जेवियर बार्टलेट

भारताचा संघ

रोहित शर्मा, शुभमन गिल (कॅप्टन),विराट कोहली, श्रेयस अय्यर,अक्षर पटेल, केएल राहुल, नितीशकुमार रेड्डी, हर्षित राणा, मोहम्मद सिराज, अर्शदीप सिंग, कुलदीप यादव , वॉशिंग्टन सुंदर, प्रसिद्ध कृष्णा, यशस्वी जयस्वाल, धृव जुरेल.

ऑस्ट्रेलियाचा संघ

मिशेल मार्श (कॅप्टन), ट्रेविस हेड, मॅथ्यू शॉर्ट, मार्नस लाबूशेन, जोश इंग्लिस, मिशेल ओन, एलेक्स कॅरी, कूपर कोनोली, जोश हेजलवूड, मिशेल स्टार्क, नॅथन एलिस, जेवियर बार्टलेट, मॅट रेनशॉ,एडम झम्पा,बेनड्वारशुइस

## दुसऱ्या वनडे मॅचमध्ये रोहित शर्मा खेळणार नाही?




दिल्ली,२२ ऑक्टोबर (पीएसआय)

भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया यांच्यात तीन सामन्यांची वनडे सीरिज खेळवली जात असून यासाठी टीम इंडिया ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर गेली आहे. यातील पर्थ येथे झालेल्या पहिल्या सामन्यात टीम इंडियाचा ७ विकेट्सने पराभव झाला. यात तब्बल ८ महिन्यांनी रोहित शर्मा हा ८ धावांवर तर विराट कोहली हा शून्य धावांवर बाद टीम इंडियाचे दिग्गज फलंदाज रोहित शर्मा विराट ी क्रिकेट सामन्यात पुनरागमन केले. त्यांच्या फलंदाजीकडे सर्वांचं लक्ष लागलेलं होतं मात्र दोघेही फ्लॉप ठरले. त्यामुळे आता एडिलेड येथे होणाऱ्या दुसऱ्या सामन्यात रोहित शर्माला प्लेईंग १११ मध्ये संधी दिली जाणार का? याबाबत चर्चा आहे. यावर टीम इंडियाचे बॅटिंग कोच सीतांशु कोटक यांनी महत्वाचं वक्तव्य केलं आहे.

पर्थ येथे झालेल्या पहिल्या सामन्यात टीम इंडियाचा सात विकेटने पराभव झाला. आता गुरुवारी २३ ऑक्टोबर रोजी दुसरा सामना खेळवला जाणार आहे. पर्थ येथील पहिल्या सामन्यात रोहित शर्मा हा ८ धावांवर तर विराट कोहली हा शून्य धावांवर बाद झाला होता. टीम इंडियाचे बॅटिंग कोच सीतांशु कोटक यांना विराट आणि रोहितच्या फ्लॉप परफॉर्मन्सबाबत विचारलं गेलं तेव्हा त्यांनी हटले की, मरोहित आणि कोहली यांच्या ंलंदाजीत काही कमतरता आहेत असे म वाटत नाही. ते आयपीएलमध्ये खेळले हेत आणि त्यांनी चांगली तयारी केली ाहे. मला वाटते दोघांनाही खूप अनुभव आहेफ ॲडलेडमध्ये खेळल्या जाणाऱ्या वनडे सामन्यापूर्वी सोशल मीडियावर रोहित शर्माबद्दल असा दावा केला जात होता की त्याला प्लेईंग ११ मधून वगळले जाईल आणि त्याच्या जागी यशस्वी जयस्वालला संधी मिळेल, परंतु बॅटिंग कोच सीतांशु कोटक यांनी स्पष्ट केले की रोहित आणि विराट दोघेही सीरिजमधील सर्व सामने खेळतील.टीम इंडियाचे बॅटिंग कोच सीतांशु कोटक यांनी, मऑस्ट्रेलियात येण्यापूर्वी त्याची (रोहित) तयारी उत्कृष्ट होती. त्यामुळे त्याच्या फॉर्मबद्दल काही चिंता आहेत असे गृहीत धरणे चुकीचं आहे असे मला वाटतेफ कोहली आणि रोहित दोघांनीही टेस्ट आणि टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे आणि आता ते फक्त वनडे सामने खेळतात. सीतांशु कोटक पुढे म्हणाले की, ममला वाटतं ते दोघेही उत्तम फॉर्ममध्ये दिसत आहेत. त्यांनी काल खूप चांगली फलंदाजी केली. प्रत्येक नेट सत्रात त्यांचा खेळाकडे पाहण्याचा दृष्टिकोन उत्कृष्ट राहिला आहेफ

रोहित आणि विराटच्या फिटनेसमध्ये कोणतीही कमी नाही :

सीतांशु कोटक म्हणाले की, मआम्हाला त्याच्या तयारीची आणि फिटनेसची योग्य माहिती होती. रोहित आणि विराट तो अधूनमधून राष्ट्रीय क्रिकेट अकादमीला भेट देतो. तिथून आम्हाला अपडेट्स आणि व्हिडिओ मिळतात. ते काय करतायत, त्यांचा सराव, फिटनेस संबंधी काम या सगळ्या संदर्भात आम्हाला माहिती देण्यात आली होतीफ



## अजूनही टीम इंडिया वर्ल्ड कप सेमीफायनलमध्ये पोहचू शकते

**नवी दिल्ली**-आयसीसी महिला वर्ल्ड कप स्पर्धेत टीम इंडियाचा सेमीफायनलमधील प्रवेश आता निर्णायक टप्प्यावर येऊन ठेपला आहे. ऑस्ट्रेलिया , इंग्लंड आणि दक्षिण आफ्रिकाया टीम्सनीआपले स्थान निश्चित केले आहे. त्यामुळे चौथ्या जागेसाठी यजमान टीम इंडिया आणि न्यूझीलंड यांच्यात मोठी चुरस पाहायला मिळत आहे. टीम इंडियाने आपले उर्वरित दोन्ही सामने जिंकल्यास त्यांचे ८ पॉईंट्स होतील आणि सेमीफायनलमधील प्रवेशाची सीट निश्चित होईल.

न्यूझीलंडविरुद्धचा सामना आवश्यक

सध्या टीम इंडिया ४ पॉईंट्ससह गुणतालिकेत चौथ्या पोझिशनवर आहे, तर न्यूझीलंडचेही ४ पॉईंट्स असून त्यांचा नेट रन रेट (र्नींं) टीम इंडियापेक्षा कमी आहे. टीम इंडियाचा पुढील सामना न्यूझीलंडविरुद्ध होणार आहे आणि हा सामना एक प्रकारे व्हर्च्युअल क्वार्टर फायनल असणार आहे. हा सामना जिंकल्यास टीम इंडियाचे ६ पॉईंट्स होतील. यानंतरही टीम इंडियाला सेमीफायनलमध्ये सहज प्रवेश मिळवण्यासाठी बांगलादेशविरुद्धचा सामनाही जिंकणं आवश्यक आहे, जेणेकरून कोणत्याही मजरतरफच्या समीकरणात अडकावे लागणार नाही.

टीम इंडियाच्या पात्रतेसाठी आणखी एक ट्विस्ट आहे. जर टीम इंडियाने न्यूझीलंडला हरवले आणि नंतर बांगलादेशकडून हरली, तर त्यांचे ६ पॉईंट्स होतील. अशा परिस्थितीत न्यूझीलंडने आपला शेवटचा सामना इंग्लंडला हरवून ६ पॉईंट्सपर्यंत मजल मारल्यास, सेमीफायनलमधील प्रवेशाचा निर्णय नेट रन रेटवर (र्नींं) अवलंबून राहील. सध्या टीम इंडियाचा नेट रन रेट अधिक चांगला असल्यामुळे त्यांना थोडासा दिलासा मिळाला आहे, पण बांगलादेशविरुद्धच्या पराभवाने एनआरआरला धक्का बसू शकतो.

## गेल्या आठ-दहा दिवसांच्या विश्रांतीनंतर निलंग्यात पाऊस

**निलंगा/प्रतिनिधी :** गेल्या आठ-दहा दिवसांच्या विश्रांती नंतर निलंगा शहरासह तालुक्यातील विविध ठिकाणी जोरदार पावसाने हजेरी लावली. त्यामुळे शेतकऱ्यांची चांगलीच तारांबळ उडाली. मागील कांही दिवसांपूर्वी निलंगा तालुक्यात अतिवृष्टी मुळे शेती पिकांचे पूर्णपणे नुकसान झाले. हातातोंडाशी आलेला पीक हे अतिवृष्टीमुळे नुकसान झाले. गेल्या आठ ते दहा दिवसांपासून पावसाने विश्रांती घेतल्याने निलंगा शहरासह तालुक्यात उन्हाचा तडाखा होता. त्यामुळे शेतकरी उरले-सुरल्या सोयाबीनसह इतर पिकांची काढणी करत राशी करण्याच्या नादात असून अनेक शेतकऱ्यांनी सोयाबीन काढून बनिम रचत आहेत. तर अनेक शेतकरी हे राशी करण्यात व्यस्त होते. मंगळवारी दि. २१ ऑक्टोबर रोजी दिवसभर उन्हाचा तडाखा जाणवत होता त्यानंतर अचानक दुपारी दोन वाजेच्या दरम्यान वातावरणात बदल झाला आणि जोरदार पाऊस झाला. तब्बल अर्धा तास झालेल्या या जोरदार पावसामुळे दिवाळी सणांच्या लक्ष्मी पूजनाला लागणाऱ्या साहित्यासह इतर साहित्य विक्रीसाठी बाजारात बसलेल्या शेतकऱ्यांची व व्यापारी तसेच खरेदीसाठी आलेल्या नागरिकांची एकच तारांबळ उडाली त्यामुळे शेतकऱ्यांची व व्यापाऱ्यांची लक्ष्मीपूजन निमित्त अनेक व्यापाऱ्यांनी झेंडूचे फुल विक्री करण्यासाठी आणले असता अचानक झालेल्या पावसामुळे अनेकांचे साहित्य भिजल्याने चांगलीच धांदल उडाली आहे.

## श्री विजय कुमार, महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे यांनी दिवाळी आणि छठपूजेच्या उत्सवानिमित्त प्रवाशांच्या सोयीसाठी करण्यात आलेल्या व्यवस्थेबाबत मुंबईतील माध्यमांना माहिती दिली



**मुंबई/प्रतिनिधी :** श्री विजय कुमार, महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे यांनी आज छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ऐतिहासिक वारसा असलेल्या इमारतीत मुंबईमधील माध्यमांसोबत पत्रकार परिषद घेऊन दिवाळी आणि छठपूजा उत्सवाच्या गर्दीच्या पार्श्वभूमीवर करण्यात आलेल्या विशेष व्यवस्थांची माहिती दिली.

या पत्रकार परिषदेत त्यांनी प्रवाशांच्या सुकर आणि आरामदायी प्रवासासाठी करण्यात आलेल्या विशेष व्यवस्थांची, चालवल्या जाणाऱ्या गाड्यांच्या संख्येची आणि अंमलात आणलेल्या काटेकोर उपाययोजनांची माहिती दिली. तसेच श्री कुमार यांनी उत्सव काळात प्रवाशांच्या सुरक्षिततेला आणि सोयीसुविधांना सर्वोच्च प्राधान्य दिले असल्याचे अधोरेखित केले.

या पत्रकार परिषदेत प्रमुख स्थानकांवरील गर्दी नियोजन आराखडा, प्रवासी सुविधा वाढविण्याच्या उपाययोजना तसेच उत्सव काळातील वाढलेल्या प्रवासी संख्येचे प्रभावी व्यवस्थापन करण्यासाठी सुरक्षा आणि संचालन विभागांमधील समन्वय याबाबतही माहिती देण्यात आली.

उत्सव काळात सर्व प्रवाशांना सुरक्षित, अखंड आणि आनंददायी प्रवासाचा अनुभव देण्यासाठी मध्य रेल्वे कटिबद्ध आहे.

## दिवाळीच्या पूर्वसंध्येला 'विचारदीपोत्सव' सर्वपक्षीय नेते, बुद्धिजीवी आणि नागरिकांचा ऐक्याचा संकल्प



**औसा/प्रतिनिधी** : दिवाळीचा सण आनंदाचा असतो, पण यंदा औसा शहरात या आनंदाला सामाजिक जाणिवेची जोड मिळाली. प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस अमर खानापुरे यांच्या अभिनव संकल्पनेतून १८ ऑक्टोबर रोजी प्राध्यापक कॉलनी येथील पवन गणेश मंदिरात 'विचारमंथन व सुसंवाद' या अनोख्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमात औसा शहरातील सर्वपक्षीय नेते, बुद्धिजीवी, सामाजिक कार्यकर्ते, व्यावसायिक, पत्रकार, कलाकार, खेळाडू, शैक्षणिक क्षेत्रातील तज्ज्ञ, अशा अनेक क्षेत्रांतील मान्यवरांनी सहभाग घेतला. या सुसंवादाच्या मंचावर शहराच्या समस्या, संधी, आणि विकासाच्या दिशांवर खुलेपणाने चर्चा करण्यात आली.कार्यक्रमाचे आयोजक अमर खानापुरे यांनी सांगितले की, दिवाळी ही केवळ दिव्यांची नाही, तर विचारांचीही असावी. औसा शहराचा सर्वांगीण विकास हा सामूहिक विचार आणि समन्वयातूनच साधता येईल. म्हणूनच राजकारण हे सकारात्मक असले पाहिजे, त्यातून सामाजिक सलोखा आणि प्रगती साधली पाहिजे, हा या उपक्रमामागचा उद्देश आहे.औसा शहराच्या भविष्याचे दिपस्तंभ ठरावे, अशा विचारमंथनाचे पुढील टप्पेही लवकरच जाहीर करण्यात येतील, असे संकेत संयोजकांनी दिले.

एकत्र आणणारा उपक्रम अनेकांसाठी प्रेरणादायी चर्चासत्रात सहभागी झालेल्या नागरिकांनी आपल्या भागातील समस्या मांडल्या, आणि त्या सोडवण्यासाठी उपाय योजनाही सुचवल्या. अनेकांनी शहराच्या प्रगतीसाठी नवीन कल्पना मांडल्या, ज्यातून औशाचा 'भविष्यातील सुंदर व सुनियोजित विकास' घडवण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले गेले.या आगळ्या-वेगळ्या कार्यक्रमाची शहरात सर्वत्र चर्चा असून, दिवाळीच्या पूर्वसंध्येला सामाजिक ऐक्य आणि रचनात्मक विचारांना एकत्र आणणारा हा उपक्रम अनेकांसाठी प्रेरणादायी ठरला आहे.

# लातूर गुन्हे शाखेकडून तीन मोटारसायकल चोरांना अटक; दोन चोरीच्या मोटारसायकली जप्त

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तीन मोटारसायकल चोरांना अटक करून त्यांच्या ताब्यातून दोन चोरीच्या मोटारसायकली जप्त केल्या आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक श्री.अमोल तांबे यांचे निर्देशान्वये अपर पोलीस अधीक्षक श्री.मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक बावकर यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

गेल्या काही दिवसांपासून लातूर शहर व परिसरात मोटारसायकल चोरीच्या तक्रारी वाढत होत्या. याबाबत पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी मालमत्तेविषयक गुन्हे उघडकीस आणावेत, अशा सूचना दिल्या होत्या त्या अनुषंगाने अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथकामधील पोलीस अधिकारी/ अमलदाराकडून कारवाई करण्यात येत होती.

पथकाला मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे पथकाने २१ ऑक्टोबर रोजी संध्याकाळी भांबरी चौक, रिंग रोड परिसरात सापळा रचला. यावेळी वसवाडी (ता. लातूर) येथील बार्शी रोड रेल्वे उड्डाण पुलाजवळ तीन संशयित इसम चोरीच्या मोटारसायकली विक्रीसाठी येणार असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. पोलिसांनी तात्काळ कारवाई करत तीन संशयितांना ताब्यात घेतले.

त्यांची चौकशी केली असता त्यांनी आपली नावे

१)कृष्णा जगन्नाथ भोसले (वय २८, रा. पाखरसांगवी),२) जितीन सहदेव गायकवाड (वय १९, रा. काळमाथा, ता. औसा) ३)सौरभ सुभाष भोळे (वय १९, रा. सोना नगर, लातूर) अशी सांगितली.

तपासादरम्यान त्यांनी दोन मोटारसायकली - एक होंडा सीबी शाईन आणि एक हिरो होंडा पॅशन प्रो - या काही दिवसांपूर्वी बार्शी रोड परिसरातून चोरी केल्याची कबुली दिली. सदर दोन्ही मोटारसायकली अंदाजे ०१ लाख २० हजार रुपये किंमतीच्या असून त्या जप्त करण्यात आल्या आहेत. पुढील चौकशीत आरोपी कडून आणखी मोटारसायकल चोरीची कबुली ची शक्यता आहे. नमूद आरोपींना एमआयडीसी पोलीस ठाण्यातील गुन्हा क्रमांक ७७०/२०२५ आणि ७७१/२०२५ कलम ३३१(२) बीएनएस अंतर्गत दाखल गुन्ह्यामध्ये अटक करण्यात आली असून पुढील तपास एमआयडीसी पोलीस ठाणे करीत आहे.

सदरची कारवाई वरिष्ठांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथकामधील पोलीस उपनिरीक्षक प्रमोद देशमुख, सफौ सर्जे राव जगताप, पोलीस अंमलदार अर्जुन



रजपूत, युवराज गिरी, सिद्धेश्वर मदने, जमीर शेख, गोविंद भोसले यांनी केली आहे. नागरिकांनी आपल्या वाहनांवर सुरक्षा साधने बसवावीत आणि संशयास्पद हालचाली आढळल्यास त्वरित पोलिसांना कळवावे, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

## पोलिस म्हणजे वर्दीतील माणूस; त्यांच्यामुळे आपण सुरक्षित

### अहमदपूरमध्ये पोलिस स्मृती दिनी उपविभागीय अधिकारी अरविंद रायबोले यांचे गौरवोद्गार

**अहमदपूर/प्रतिनिधी :**पोलिस म्हणजे वर्दीतील माणूस; त्यांच्या त्यागामुळेच आपण सुरक्षित आहोत. पोलिस हे केवळ कायदा राबवणारे यंत्र नाहीत, तर ते समाजाचे खरे रक्षक आहेत, असे प्रतिपादन पोलिस उपविभागीय अधिकारी अरविंद रायबोले यांनी केले.

शिस्त, समर्पण आणि बलिदान यांचे प्रतीक असलेल्या पोलिस दलातील शहिदांच्या शौर्याला अभिवादन करण्यासाठी अहमदपूर शहरात पोलिस स्मृती दिन अत्यंत कृतज्ञतेच्या भावनेने साजरा करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. संस्कृती गार्डन येथे मराठवाडा साहित्य परिषद (मसाप), रोटरी क्लब आणि अहमदपूर पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त विद्यमाने या अभिवादन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.या सोहळ्यात कर्तव्य बजावताना शहीद झालेल्या पोलीस बांधवांना आदरांजली अर्पण करण्यात आली. अध्यक्षीय समारोपात बोलताना उपविभागीय पोलिस अधिकारी अरविंद रायबोले यांनी नागरिकांना शांतता, कायदा व सुव्यवस्थेचे पालन करण्याचे आवाहन केले. समाजात संयम, सहिष्णुता आणि समोपचाराची गरज असून, सामाजिक आरोग्य टिकवण्यासाठी पोलिसांचे योगदान अतुलनीय आहे.




त्यांनी नागरिकांना आवाहन केले की, शहीद पोलिसांचा त्याग कधीच विसरू नये आणि त्यांच्याविषयी कृतज्ञतेचा भाव कायमस्वरूपी मनात ठेवावा. यावेळी मंचावर पोलिस निरीक्षक विनोद मेत्रेवार, मसापाचे अध्यक्ष सत्यनारायण काळे आणि रोटरीचे अध्यक्ष कपिल बिरादार उपस्थित होते. मसापाचे महेंद्र खंडागळे, रोटरी क्लबचे कपिल बिराजदार आणि डॉ. अशोकराव सांगवीकर यांच्यासह अन्य मान्यवरांनीही शहीद जवानांचे स्मरण करून आदरांजली वाहिली. पोलीस उपनिरीक्षक आनंद श्रीमंगल यांनी प्रास्ताविक केले, तर जिलानी शेख यांनी आभारप्रदर्शन केले. या कार्यक्रमाला साहित्यिक, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आपण घरी उत्साहात असताना पोलिस आपल्या कुटुंबाला सोडून कर्तव्यात असतात पोलिस कर्मचारी प्रत्येक सण, प्रत्येक आपत्ती आणि संकटात आपल्या कुटुंबाला सोडून कर्तव्यावर असतो. दिवाळीसारख्या सणांदरम्यान नागरिक घरी आनंद साजरा करत असताना, पोलिस मात्र आपले कर्तव्य बजावत असतात.कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे, असेही ते म्हणाले.

## गोमूत्र, सेंद्रिय उत्पादनांची रवींद्र महाराजांकडून जागृती

**लातूर/प्रतिनिधी :** आजच्या धावपळीच्या यांत्रिक जीवनशैलीत जिथे जनावरांकडे दुर्लक्ष होत आहे, अशा परिस्थितीत देवणी शहराजवळील जानकी गोशाळा गोधनाच्या संवर्धनासाठी एक प्रेरणास्रोत बनली आहे. या गोशाळेत कत्तलखान्याकडे नेल्या जाणाऱ्या ३०० हून अधिक गायी आणि गोवंशाची सुटका करून त्यांचे प्रेमपूर्वक संगोपन, पालनपोषण आणि उपचार केले जातात.

जानकी गोशाळेचे प्रमुख रवींद्र महाराज यांनी देशभरातील भ्रमंतीनंतर गो संवर्धनाचे हे पवित्र कार्य हाती घेतले. अनेक आर्थिक संकटे आणि अल्प साधनसामग्रीवर मात करून त्यांनी या गोशाळेची उभारणी केली असून, आज ही गोशाळा संपूर्ण परिसरात गोधन रक्षणाचे केंद्र ठरली आहे.

या गोशाळेत दिवाळीचा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सर्व गायींना स्नान घालून त्यांची मनोभावे आरती करण्यात आली, ज्यात शेतकरी आणि स्थानिक ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

रवींद्र महाराज केवळ गायींचे संगोपनच करत नाहीत, तर ते गोमूत्र, शेणखत आणि सेंद्रिय उत्पादनांचे महत्त्व पटवून देण्यासाठी सातत्याने जनजागृती करत आहेत. त्यांच्या या प्रयत्नांमुळे परिसरातील अनेक शेतकऱ्यांनी रासायनिक खतांना फाटा देत सेंद्रिय खतांचा वापर सुरू केला आहे. जानकी गोशाळा हे केवळ निवारा केंद्र नसून, ती भारतीय संस्कृती आणि नैसर्गिक शेती परंपरेचे पुनरुज्जीवन करणारे एक महत्त्वाचे केंद्र बनले आहे. गोवंशाचे संवर्धन, पर्यावरणाचे रक्षण आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विकास या तिन्ही उद्दिष्टांचा सुंदर संगम या गोशाळेत दिसून येतो. दिवाळीच्या या पावन पर्वावर गोशाळेत आनंद, भक्तीभाव आणि संवेदनांचा अनोखा मिलाफ अनुभवायला मिळतो. आर्थिक आव्हानांवर मात करूनही गोधन वाचवण्याचा प्रयत्न समाजासाठी प्रेरणादायी आहे.

## ०९ लाख ३८ हजार रुपयांचा प्रतिबंधित गुटखा, सुगंधित तंबाखू वाहनासह जप्त

## दोन व्यक्ती विरुद्ध ०२ गुन्हे दाखल; स्थानिक गुन्हे शाखेची अवैध धंद्यावर कारवाई

**लातूर/प्रतिनिधी :** पोलीस अधीक्षक अमोल तांबे,अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात अवैध धंद्यावर कठोर कारवाई साठी मोहीम जिल्ह्यामध्ये राबविण्यात येत आहे.

त्या अनुषंगाने अवैध धंद्यावर कारवाई करीत असताना दिनांक १८ ऑक्टोंबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला माहिती मिळाली की, काही इसम महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेले अन्नपदार्थ गुटखा व तंबाखूजन्य पदार्थाची अवैध विक्री व्यवसाय,साठवणूकसाठी वाहतूक करीत आहेत.

सदर माहितीवरून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेच्या दोन पथकांनी



पोलीस ठाणे उदगीर ग्रामीण व वाढवणा हद्दीत सापळा लावून महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्यामध्ये विक्रीसाठी प्रतिबंधित केलेला गुटखा व सुगंधित तंबाखूची अवैध विक्री व्यवसाय, साठवणूक करण्यासाठी वाहतूक करणाऱ्यावर ०२ गुन्हे दाखल करण्यात आले असून दोन्ही गुन्ह्यात ०४ लाख १८ हजार ७९६ रुपयांच्या प्रतिबंधित गुटखा व सुगंधित तंबाखूचा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच गुन्ह्यामध्ये वापरलेली ०५ लाख २० हजार रुपयाची दोन वाहन असा एकूण ०९ लाख ३८ हजार ७९४ रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

प्रतिबंधित गुटख्याची अवैधरित्या विक्री, वाहतूक, साठवणूक करताना मिळून आलेले इसम नामे १) अमजद निजामुद्दीन बिद्रे, ३७ वर्ष , राहणार कुमठा, तालुका अहमदपूर. २) परमेश्वर काशिनाथ वसमते वय ३६ वर्ष, राहणार आवलकोंडा, तालुका उदगीर.

याचे विरुद्ध अनुक्रमे पोलीस ठाणे उदगीर ग्रामीण, वाढवणा येथे दोन गुन्हे दाखल करण्यात आले असून गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक अमोल तांबे,अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील दोन पथकातील पोलीस अंमलदार साहेबराव हाके, रियाज सौदागर,अर्जुन रजपूत, मनोज खोसे, संजय कांबळे, सूर्यकांत कलमे, पाराजी पुट्टेवाड, तुळशीराम बुरुरे यांनी केली आहे.

लातूर स्थानिक गुन्हे शाखेने अलीकडच्या काळात गुटख्यावर अनेक यशस्वी कारवाया केल्या आहेत. या कारवाया पोलीस अधीक्षक अमोल तांबे आणि अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करण्याच्या मोहिमेचा भाग असून स्थानिक गुन्हे शाखा प्रतिबंधित गुटख्याची विक्री आणि वाहतूक थांबवण्यासाठी सतत सक्रिय आहे.



## एस. टी. बसला कंटेनरची धडक एस. टी. तील प्रवासी बालंबाल वाचले

**लातूर/प्रतिनिधी :** शहरातील राजीव गांधी चौकात इचलकरंजी आगाराच्या एस. टी. बसला कंटेनरची धडक बसली. एस. टी. तील प्रवासी बालंबाल वाचले. भर चौकात अपघात झाल्याने वाहतुक खोळंबली होती. काही वेळानंतर जेसीबीने दोन्ही वाहने वेगळे करून वाहतूक सुरळीत करणयात आली. या बसमध्ये १५ प्रवासी होते. कोणीही गंभीर जखमी नाही, असे बस चालकाने सांगितले. अपघातस्थळी पोलीस प्रशासन पोहोचे, एस. टी. महामंडळाचे लोक पोहोचले तरीदेखील

जागेवरील अपघातग्रस्त गाड्या न हलवल्यामुळे वाहतुकीला प्रचंड कोंडी निर्माण झाली होती. तब्बल एक तासानंतर अपघातग्रस्त एस. टी. बस व कंटेनर जेसीबीने बाजूला काढण्यात आले आणि वाहतूक सुरळीत झाली. दिपावली सणातील लक्ष्मीपुजनाची धावपळ सुरु असतानाच राजीव गांधी चौकात हा अपघात होऊन वाहतुक कोंडी झाल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागला.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# तुळजापुरात ५ हजार कुटुंबांना दिवाळीचा शिधा विनोद गंगणे यांच्यावतीने आयोजित वाटप कार्यक्रमात आ.राणा पाटील यांच्या हस्ते वितरण



तुळजापूर(प्रतिनिधी)-तुळजापूर युवक नेते विनोद गंगणे यांच्या वतीने शहरातील ५ हजार कुटुंबाला दिपावली निमित्त भाऊबीज भेट देण्यात आली. यामध्ये दिपावली फराळासाठी आवश्यक सर्व किराणा देण्यात आला आहे. विनोद गंगणे यांच्या भाऊबीज भेट वाटपाचे या वर्षी सलग १७ वे वर्ष आहे.

शहरातील हडको मैदानावर आयोजित कार्यक्रमात महंत तुकोजीबुवा, आ. राणा पाटील यांच्या हस्ते दिपावली भेटीचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाला जिल्हाध्यक्ष दत्ता कुलकर्णी, माजी नगराध्यक्षा अर्चना गंगणे, नितीन काळे, सुनील चव्हाण, प्रिया गंगणे, सज्जन सांळुके, सचिन रोचकरी, आनंद कंदले आदी मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी जिजामाता नगर, हाडको, विवेकानंद नगर, आराधवाडी, मातंग नगर आदी विविध भागातील ५ हजार कुटुंबाला दिपावली निमित्त आवश्यक किराणा साहित्याचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी माऊली भोसले, निलेश रोचकरी, नरेश अमृतराव, अंबरीश जाधव, रामचंद्र रोचकरी, पंडित जगदाळे, विशाल रोचकरी, नागेश नाईक, मनोज गवळी, आदींची उपस्थिती होती. सूत्रसंचालन प्रकाश मगर यांनी केले तर आभार विजय गंगणे यांनी मानले. शहरातील वृत्तपत्र विक्रेत्या बांधवांचा केला सन्मान या कार्यक्रमात बाजार समितीचे माजी सभापती विजय गंगणे यांचा वतीने शहरातील वृत्तपत्र विक्रेत्यांचा भरपेहराव आहेर करून सन्मान करण्यात आला. या प्रसंगी गंगणे यांचा वतीने वृत्तपत्र विक्रेत्याना दिपावली निमित्त किराणा साहित्याचे किट वाटप करण्यात आले.

सलग १७ वर्षांपासून होतेय वाटप, गंगणे यांचा सत्कार विनोद गंगणे यांच्या वतीने गेल्या १७ वर्षांपासून दिपावलीत भाऊबीज भेटीचे वाटप करण्यात येत आहे. या शिवाय मुस्लिम बांधवांच्या पवित्र रमजान महिन्यात गंगणे यांच्या वतीने ईदसाठी आवश्यक किराणा साहित्याचे वाटप करण्यात येत असते. गेल्या १७ वर्षांपासून हिंदू - मुस्लिमांचा सण गोड करत असल्याबद्दल विनोद गंगणे यांचा आ. राणा पाटील यांचा हस्ते सत्कार करण्यात आला.

# पाडव्याच्या मुहूर्तावर बाजारपेठेत झेंडूची आवक वाढली केळीच्या खुंटासह पूजा साहित्य खरेदीसाठी धाराशिवरांची गर्दी



दिवाळीत लक्ष्मीपूजनाचे विशेष महत्त्व असल्यामुळे लक्ष्मीपूजनाला लागणारी फुले, हार, केळीचे खुंट, बत्ताशे खरेदीसाठी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक, नेहरू चौकात ग्राहकांची मोठी गर्दी केली होती. यासह शहरातील राजमाता जिजाऊ चौक, सेंट्रल बिल्डिंग चौक, देशपांडे स्टँडसह बोंबले हनुमान मारुती चौकात फुले खरेदीसाठी धाराशिवकरांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. लक्ष्मीपूजनाच्या आदल्या दिवशी चांगल्या दर्जाचा झेंडू १२५ रुपये किलोने विक्री होत होता. मात्र लक्ष्मीपूजनादिवशी धाराशिवच्या बाजारपेठेत जवळपास ५० ते ६० टन झेंडूची आवक झाल्याने दर कोसळले. काही ठिकाणी शेतकरी बारिक आकाराची झेंडूची फुले ५० रुपये किलोने तर काही ठिकाणी १०० रुपये किलोने झेंडूची विक्री होत होती. केळीचे खुंट ५०, ७०, १०० रुपयांच्या दराने विक्री होते. जिल्ह्यातील पूर परिस्थितीमुळे झेंडूचे उत्पादन घटले आहे. परंतु जिल्ह्याबाहेरून, तसेच काही प्रमाणात वाचलेल्या झेंडूची लक्ष्मीपूजनादिवशी मोठी आवक झाल्याने दर घसरले. झेंडूसह केळीचे खुंट, अन्य पूजा साहित्यांनी बाजारपेठ सजली होती.

पूजा साहित्याची रात्री उशिरापर्यंत खरेदी लक्ष्मीपूजनासाठी पाच प्रकारची फळे, गोड मिठाई, लक्ष्मीची मूर्ती, फोटो, फटाके, पूजा साहित्य खरेदीसाठी धाराशिव शहरात नागरिकांनी नेहरू चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौकात मोठी गर्दी केली होती. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी लक्ष्मीचे रूप म्हणून केरसुणीची पूजा केली जात असल्याने रांगोळी, लक्ष्मीचे प्रतीक असलेल्या केरसुणी, बताशे, खारिक, सुपारी, फळे खरेदीसाठी धाराशिवकरांची अलोट गर्दी पाहायला मिळाली. लक्ष्मीपूजनासाठी लागणारे झेंडूंची फुले, केळीचे खुंट, पूजा साहित्य विक्रीची दुकाने आले होते. लक्ष्मीची मूर्ती, केरसुणी, आवळा, चिंच, सुपारीसह अन्य खरेदीसाठी महिला कुटुंबासह आल्या होत्या. शहरातील बाजारपेठ रात्री उशिरापर्यंत फुललेली होती.

# डॉ. कलाम यांचे जीवन म्हणजेच सर्व सामान्यांना प्रेरणा देणारे व्यक्तीमत्त्व-विवेकानंद जाधव

उमरगा (प्रतिनिधी)-येथील श्री राष्ट्रीय शिक्षण प्रसारक संस्था संचलित स्वामी विवेकानंद प्रा विद्यामंदिर मध्ये डॉ एपीजे अब्दुल कलाम यांचा जन्मदिन वाचन प्रेरणा दिन म्हणून बुधवारी (१५) साजरा करण्यात आला. भारताचे माजी राष्ट्रपती थोर वैज्ञानिक डॉ. ए पी जे अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिवस म्हणून साजरा करण्यात आला. अध्यक्षीय भाषणात विवेकानंद जाधव म्हणाले की, माजी राष्ट्रपती डॉ. कलाम यांचे जीवन म्हणजेच सर्व सामान्यांना प्रेरणा देणारे व्यक्तिमत्व होते. अत्यंत गरिबीतूनही जर इच्छाशक्ती असेल तर असाध्य ते साध्य होते हे डॉ. कलमाकडे पाहिल्यानंतर लक्षात येते. म्हणूनच त्यांचा जन्मदिवस आजच्या विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी व वाचनाने देशाच्या प्रगतीत कशी भर पडते याची प्रचिती येण्यासाठी वाचनप्रेरणा दिवस म्हणून साजरा करतो. मुख्याध्यापक गोपाळ आष्टे, सांस्कृतिक विभागप्रमुख समीर देशपांडे, व्यंकटराव वचने, जैतूनबी मेंडके, बेबीसरोजा पवार यासह शिक्षक उपस्थित होते. याप्रसंगी पहिली ते सातवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी प्रथम सत्र परीक्षा सुरू असल्याने प्रश्नपत्रिकाचे वाचन केले. बेबीसरोजा पवार यांनी सूत्रसंचालन केले. जैतूनबी मेंडके यांनी आभार मानले.


# लातूर समाचार धाराशिव

## बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क

**9422472502**

**9175325708**


## Name of change Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : KAZI TANVIR FAROOQ.
TO KAZI TANVIRBANO FAROOQ.
Hence for this Declaration i will be known by this name and will use in future the KAZI TANVIRBANO FAROOQ. will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- KAZI TANVIR FAROOQ.
NEW NAME:- KAZI TANVIRBANO FAROOQ.
Address :- KAZI GALLI, AT POST IEET, TA. BHOOM, DIST. Osmanabad -413534.
Adhar no.-721645135038
Mob. No.-8805612735

## Name of change Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : ATUL PRABHAKAR CHIKSHE TO: ATULRAO PRABHAKARRAO CHIKSHE
Hence for this Declaration i will be known by this name and will use ATUL PRABHAKAR CHIKSHE in future the same will used by my family husband / wife, children and relative.
OLD NAME :- ATUL PRABHAKAR CHIKSHE
NEW NAME :- ATULRAO PRABHAKARRAO CHIKSHE
Address -27/132 Shram Safallya Siddhivinayak Mandir Anand Nagar Osmanabad
DIST. Osmanabad. -413501
Adhar n.-866367799397
Mob.8766566709

## Name of change Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was :ANJALI ATUL CHIKSHE TO: ANJALI ATULRAO CHIKSHE
Hence for this Declaration i will be known by this name and will use ANJALI ATUL CHIKSHE in future the same will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- ANJALI ATUL CHIKSHE
NEW NAME :- ANJALI ATULRAO CHIKSHE
Address -27/132 Shram Safallya Siddhivinayak Mandir Anand Nagar Osmanabad DIST. Osmanabad. -413501
Adhar n.-724693152692
Mob.8766566709

## Name of change Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : CHIKSHE AKSHAY ATUL TO: AKSHAY ATULRAO CHIKSHE
Hence for this Declaration i will be known by this name and will use AKSHAY ATUL CHIKSHE in future the same will used by my family husband / wife, children and relative.
OLD NAME :- AKSHAY ATUL CHIKSHE
NEW NAME :- AKSHAY ATULRAO CHIKSHE
Address -27/132 Shram Safallya Siddhivinayak Mandir Anand Nagar Osmanabad DIST. Osmanabad. -413501
Adhar n.-947886539803
Mob.8766566709

## Name of change Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : CHIKSHE ADITI TO: ADITI ATULRAO CHIKSHE
Hence for this Declaration i will be known by this name and will use CHIKSHE ADITI in future the same will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- CHIKSHE ADITI
NEW NAME :- ADITI ATULRAO CHIKSHE
Address -27/132 Shram Safallya Siddhivinayak Mandir Anand Nagar Osmanabad DIST. Osmanabad. -413501
Adhar n.-872214739389
Mob.9404278410

**झाडे लावा!**
**झाडे जगवा!!**
**झाडे तोड रोखा !!!**

# आरोग्य योजनांच्या एकत्रीकरणासाठी 'वॉर रूम'ची स्थापना

मुंबई, (प्रतिनिधी)- राज्यातील विविध आरोग्य योजनांचा समन्वय साधण्यासाठी, दुहेरी लाभ टाळण्यासाठी आणि सर्व आरोग्यविषयक योजनांची अंमलबजावणी एकाच छताखाली प्रभावीपणे करण्यासाठी 'वॉर रूम' स्थापन करण्यात येत आहे. ही वॉर रूम' मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या देखरेखीखाली कार्य करणार असून, महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्रा) चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली हा कक्ष स्थापन केला जाणार आहे.

या उपक्रमाचा उद्देश राज्यातील विविध आरोग्य योजनांचे सुसूत्रीकरण, पारदर्शकता आणि तातडीने मदत उपलब्ध करून देणे हा आहे. सध्या मुख्यमंत्री सहाय्यता निधी, महात्मा फुले जनआरोग्य योजना, आयुष्मान भारत योजना आदी इतरही योजना नागरिकांना मोफत किंवा सवलतीत उपचारांची सुविधा देतात. मात्र काही प्रकरणांमध्ये एकाच रुग्णाने दोन किंवा अधिक योजनांचा लाभ घेतल्याची नोंद झाल्याने शासकीय निधीचा अपव्यय टाळण्यासाठी आणि योजनांची समन्वित अंमलबजावणी करण्यासाठी ही वॉर रूम स्थापन करण्यात येणार आहे. नागरिकांना राज्य व केंद्र शासनाच्या सर्व आरोग्य योजनांविषयी माहिती, मार्गदर्शन आणि मदत मिळावी यासाठी एकच सामान्य टोल-फ्री क्रमांक - १८०० १२३ २२११ उपलब्ध करून देण्यात आला आहे. या क्रमांकावरून नागरिकांना तात्काळ माहिती,मार्गदर्शन आणि आवश्यक मदत मिळणार आहे.सर्व अर्ज,शंका व तक्रारींचे निवारण या वॉर रूमच्या माध्यमातून केले जाणार असून, त्यावर मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे थेट नियंत्रण राहणार आहे.

**समितीची रचना**

केंद्र व राज्य शासनाच्या विविध आरोग्य योजनांची प्रभावी, जलद आणि पारदर्शक अंमलबजावणी करण्यासाठी तसेच दुहेरी लाभ आणि अपात्र प्रकरणे टाळण्यासाठी मुख्यमंत्री सचिवालयात उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. या १२ सदस्यीय समितीच्या अध्यक्षस्थानी, प्रवीण परदेशी, मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्रा) तर, सार्वजनिक आरोग्य, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, महिला व बालविकास,कामगार, आदिवासी विकास,अल्पसंख्यांक विकास,दिव्यांग कल्याण आणि विधि व न्याय विभागाचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव तसेच,मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख हे सदस्य म्हणून नियुक्त आहेत. त्याचप्रमाणे सहाय्यक संचालक,मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, मुख्यमंत्री सचिवालय यांचा सदस्य सचिव म्हणून समावेश आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशाने केंद्र व राज्य शासनाच्या सर्वच आरोग्य योजनांचे एकत्रीकरण आणि पारदर्शकतेतून गरजू रुग्णांना मोफत किंवा सवलतीच्या दरात उपचार देण्यासाठी नियमित प्रयत्न सुरू आहेत.त्यातूनच या 'वॉर रूम'ची स्थापना करण्यात येत आहे. प्रत्येक नागरिकाला त्याच्या पात्रतेनुसार योग्य योजनेचा लाभ मिळावा आणि खऱ्या लाभार्थ्यांपर्यंत 'निधी' पोहोचावा,यासाठी हा उपक्रम निश्चितच उपयोगी ठरणार आहे,असे मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी सांगितले.

# धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५)
२२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४

# ट्रॅक्टरची घरासमोरून चोरी

तामलवाडी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी अमर नवनाथ वडणे, वय २६ वर्षे, रा.माळुंब्रा ता. तुळजापूर जि. धाराशिव यांचा अंदाजे ५,४०,००० किंमतीचा एक कुबोटा ऑरेंज रंगाचे ट्रॅक्टर क्र एमएच २५ एडब्ल्यु २४७३ व ट्रॉली हे दि. १६.१०.२०२५ रोजी ००.०० ते ०५.०० वा. सु. अमर वडणे यांचे राहते घरासमोरुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-अमर वडणे यांनी दि.१६.१०.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तामलवाडी पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

# एक म्हैस व एक वगारची चोरी

बेंबळी(प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी ओम हरी पाटील, रा. करजखेडा ता. जि. धाराशिव यांची अंदाजे ६०,००० किंमतीची एक म्हैस व एक वगार ही दि.१०.०९.२०२५ रोजी शेतातून अज्ञात व्यक्तीने चोरुन नेल्या बेंबळी पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

# पॅटचे पाठीमागील खिशात ठेवलेले रोखमेची चोरी

भुम (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी शिवशंकर पांडुरंग पौळ, वय ३५ वर्षे, रा.कुसुमनगर भुम ता. भुम जि. धाराशिव हे दि. १६.१०.२०२५ रोजी १५.४० वा. सु. भुम येथील आठवडी बाजार येथे बाजार करत असताना शिवशंकर पौळ यांचे पॅटचे पाठीमागील खिशात ठेवलेले रोख रक्कम १५,००० हे अज्ञात व्यक्तीने गर्दीचा फायदा घेवून चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-शिवशंकर पौळ यांनी दि.१६.१०.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भुम पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२
Latur Samachar Printed & Published by Jade Dayanand Shankar , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,Dharashiv (Osmanabad) Editor : Jade Dayanand Shankar Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649